रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ११
www.ramprahar.com
सोमवार, २८ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## मुख्यमंत्र्यांनी सांगितले महाराष्ट्राच्या मनात काय?



**नागपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी (दि. २७) नागपूर दौऱ्यावर होते. या दौऱ्यादरम्यान त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. या वेळी मुख्यमंत्र्यांनी ठाकरे बंधूंच्या भेटीवर भाष्य केले. ते म्हणाले, उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस आहे. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी राज ठाकरे गेले ही आनंदाची बाब आहे. यात राजकीय का पाहता? आमच्याही उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा! वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा द्यायला जाणे यात राजकारण पाहणे योग्य नाही. महाराष्ट्रातल्या मनात काय आहे हे तुम्हाला विधानसभेच्या निवडणुकीत दिसले आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दिसेल, मात्र काही पक्षाच्या नेत्यांच्या मनात काय आहे, हे महाराष्ट्राच्या मनातले आहे, असे म्हणणे योग्य नाही. ते फार मोठे विधान होईल, असेही ते म्हणाले.

अंतरंग
बेपत्ता तीन मच्छीमारांचा शोध सुरूच/२
माथेरान घाटात मोठा दगड कोसळला/५
शुबमन गिलने मोडला मोहम्मद युसुफचा विक्रम/८

# पुण्यात रेव्ह पार्टीवर धाड

## एकनाथ खडसेंच्या जावयासह सात जण अटकेत





**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात रविवारी (दि. २७) मध्यरात्री रेव्ह पार्टीवर कारवाई करण्यात आली. यामध्ये माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचा जावई प्रांजल खेवलकर यांच्यासह सात जणांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये दोन तरुणींचाही समावेश आहे. न्यायालयाने सर्व आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पुण्यातील खराडी येथील रॅडिसन हॉटेलच्या मागे एका इमारतीच्या फ्लॅटमध्ये ही रेव्ह पार्टी करण्यात येत होती. दोन तरुणी आणि पाच पुरुष या पार्टीत होते. यापैकी प्रांजल खेवलकर (वय ४१) हा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांचा पती आहे.

पोलिसांनी रेव्ह पार्टी सुरू असलेल्या फ्लॅटमधून हुक्का, गांजा, कोकेन, दारू, १० मोबाईल, दोन चार चाकी गाड्या आणि ४१ लाख रुपये जप्त केले आहेत. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# शिवरायांच्या किल्ल्यांचा प्रत्येक दगड ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार

### 'मन की बात'मध्ये पंतप्रधान मोदींचे उद्गार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

'युनेस्को'ने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. या किल्ल्यांपैकी प्रत्येक किल्ल्याशी इतिहासाचे एक पान जोडलेले आहे आणि येथील प्रत्येक दगड ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २७) काढले.

'मन की बात'च्या १२४व्या भागात बोलताना पंतप्रधान मोदींनी शिवरायांच्या गौरवास्पद इतिहासाला उजाळा दिला. ते म्हणाले, या १२ किल्ल्यांपैकी ११ किल्ले महाराष्ट्रात, तर एक तामिळनाडूमध्ये आहे. प्रत्येक किल्ल्याचा स्वतःचा गौरवशाली इतिहास आहे. साल्हेरचा किल्ला, जिथे मराठ्यांनी मुघलांचा दारूण पराभव केला. शिवनेरी, जिथे छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला; इतका सुरक्षित किल्ला की शत्रू त्याला कधीही भेदू शकला नाही. समुद्राच्या मधोमध बांधलेला खांदेरीचा किल्ला हे एक अद्‌भूत आश्चर्य आहे. शत्रूंनी त्यांना रोखण्याचा खूप प्रयत्न केला, पण महाराजांनी अशक्य ते शक्य करून दाखवले.

### रायगड भेटीच्या आठवणीला उजाळा

या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या दुर्गराज रायगड भेटीची आठवणही सांगितली. प्रतापगड येथे अफझलखानाचा वध झाला, त्या पराक्रमाचा प्रतिध्वनी आजही किल्ल्याच्या भिंतींमध्ये घुमतो. विजयदुर्ग येथे गुप्त भुयारे होती, हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण आहे. काही वर्षांपूर्वी मी ऐतिहासिक रायगडाला भेट दिली आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक झालो होतो. तो अनुभव माझ्यासाठी आयुष्यभराची प्रेरणा आहे, असे पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

## हरिद्वारमधील मनसा देवी मंदिरात चेंगराचेंगरी

### सहा भाविकांचा मृत्यू, अनेक जखमी

**हरिद्वार : वृत्तसंस्था**

उत्तराखंडमधील हरिद्वार येथील प्रसिद्ध मनसा देवी मंदिरात रविवारी (दि. २७) सकाळी गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाल्याची धक्कादायक घटना घडली. यामध्ये सहा जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार मंदिरात मोठी गर्दी जमली होती. त्यामुळे चेंगराचेंगरी झाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि प्रशासकीय टीम तातडीने घटनास्थळी पोहचली आणि मदतकार्य सुरू करण्यात आले.

चेंगराचेंगरीची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय पथके घटनास्थळी दाखल झाली. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

## मोरा बंदरात बुडून खलाशाचा मृत्यू

**उरण :** अलिबागच्या खांदेरीजवळील समुद्रात शनिवारी करंजा येथील एक बोट बुडाल्यानंतर रात्री उशिरा मोरा बंदरात खलाशांना घेऊन येणाऱ्या छोट्या बोटीला अपघात झाला. यात एकाचा बुडून मृत्यू झाला आहे. सुरेश गौतम (वय २२) असे या खलाशाचे नाव असून तो मूळचा उत्तर प्रदेशातील रहिवाशी आहे.

मोरा बंदरानजीक रो-रो जेट्टीजवळ मोठ्या मासेमारी बोटीच्या दुरुस्तीसाठी काही कारागिर छोटी बोट घेऊन गेले होते. ते परतत असताना भरती आणि वादळी वाऱ्याने ही बोट उलटली. त्यातील पाच जण पोहून किनाऱ्यावर आले, मात्र सुरेश गौतमला दम लागल्याने बुडाला. त्याचा मृतदेह रविवारी सकाळी किनाऱ्यावर सापडला.

## 'आरडीसीए'ला मैदान मिळण्यासाठी प्रयत्न करणार -आमदार प्रशांत ठाकूर



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनला (आरडीसीए) पनवेल तालुक्यासह रायगड जिल्ह्यात कुठेही राज्य शासनाच्या वतीने मैदानासाठी दीर्घ मुदतीकरिता जागा मिळावी यासाठी आपण शर्थीचे प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी 'आरडीसीए'च्या पदाधिकाऱ्यांना दिले आहे.

आरडीसीएला स्वतःचे मैदान नसल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. असोसिएशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध वयोगटातील मुला-मुलींच्या क्रिकेट स्पर्धा, सराव शिबिरे यासाठी जिल्ह्यातील विविध कंपन्यांकडील किंवा खासगी क्लबकडील मैदानांवर अवलंबून रहावे लागते व त्याची उपलब्धता ही काही मर्यादित दिवसांसाठी होते.

या पार्श्वभूमीवर आरडीसीएने त्यांना स्वतःच्या हक्काचे मैदान मिळावे यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या संदर्भात पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सहकाऱ्यांनी भेट घेतली. आरडीसीएच्या प्रस्तावावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या संदर्भात येत्या आठवड्यात राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची आपण भेट घेऊन त्यांना आरसीडीएच्या वतीने निवेदन प्रस्ताव देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आरडीसीएला स्वतःच्या हक्काचे मैदान मिळाल्यास जिल्ह्यातील होतकरू खेळाडूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

## निवडक

### छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांच्या कारवाईत चार नक्षलवादी ठार

**बिजापूर :** छत्तीसगडच्या बिजापूरमध्ये सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. १७ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या दोन महिलांसह चार नक्षलवादी चकमकीत ठार झाले आहेत. चकमकीच्या ठिकाणाहून एक एसएलआर, एक इन्सास, एक ३०३ रायफल, एक १२ बोर बंदूक, बीजीएल लाँचर, सिंगल शॉट शस्त्र, मोठ्या प्रमाणात स्फोटके आणि नक्षल संबंधित इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत.

### एक्सप्रेस वेवर बोरघाटात पुन्हा दरड कोसळली

**खालापूर :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाटातील अमृतांजन ब्रिज येथे दरड कोसळल्याची घटना ताजी असतानाच रविवारी (दि. २७) पुन्हा या घाटात दरड कोसळली. शिंग्रोबा मंदिराजवळील झोपडीखाली दगड व मातीचा भाग खाली आला. या झोपडीत दोन पुजारी रहात होते. ते वेळीच बाहेर आल्याने अनर्थ टळला. खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. **(अधिक वृत्त पान २ वर..)**

## राष्ट्रवादीच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी सुधाकर घारे




**नेरळ : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रायगड जिल्हा अध्यक्षपदी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी घारे यांच्या नावाची घोषणा करीत त्यांना नियुक्तीपत्र दिले.

मावळते जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील यांच्यावर काही दिवसांपूर्वी दोनवेळा शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. पक्षाला फार वेळ देऊ शकत नसल्याने त्यांनी याबाबत अवगत केले होते. या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी आपल्या सुतारवाडी येथील कार्यालयात रविवारी (दि. २७) कार्यकर्त्यांची बैठक बोलावली होती. या वेळी त्यांनी सुधाकर घारे यांचे नाव जिल्हाध्यक्षपदी जाहीर केले.

काही दिवसांपूर्वीच सुधाकर घारे यांच्याकडे राष्ट्रवादीच्या कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली होती. त्याला महिना उलटत नाही तोच आता घारे यांना पक्षाचे जिल्हाध्यक्षपद देण्यात आले आहे. या वेळी मुश्ताक अंतुले व अन्य नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

## १ ऑगस्टपासून यूपीआय व्यवहारांसंदर्भात नवे नियम

**मुंबई : प्रतिनिधी**

१ ऑगस्टपासून गुगल पे, फोन पे, पेटीएम आणि इतर यूपीआय ॲप्सवर नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनसीपीआय)द्वारे काही नियम बदलले जाणार आहेत. या बदलांमुळे रोजच्या व्यवहारांवर थेट परिणाम होणार आहे.

आता प्रत्येक यूपीआय ॲपवर दिवसातून जास्तीत जास्त ५० वेळा (काही बँकांसाठी १० वेळा) बॅलन्स चेक करता येईल. यापेक्षा जास्त वेळा बॅलन्स तपासता येणार नाही. प्रत्येक व्यवहारानंतर फक्त तीन वेळा ट्रान्झॅक्शन स्टेटस रिफ्रेश करता येईल आणि प्रत्येक वेळी किमान ९० सेकंदांची गॅप असावी लागेल.

एका ॲपवर आपल्या फोन नंबरशी लिंक केलेले बँक खाते दिवसातून फक्त २५ वेळा पाहता येईल. नेटफ्लिक्स, म्युच्युअल फंड एसआयपी, वीज/पाणी बिल यांसारख्या ऑटो डेबिट व्यवहार आता फक्त ठराविक वेळेत (सकाळी ६ ते रात्री ९ किंवा सकाळी १० ते दुपारी १ आणि संध्याकाळी ५ ते रात्री ९:३० या वेळेतच) प्रोसेस होतील. उर्वरित वेळेत ऑटोपे रिक्वेस्ट लगेच प्रोसेस होणार नाहीत.

नेटवर्कवरील लोड कमी करण्यासाठी एनसीपीआयने हे बदल जाहीर केले आहेत, जेणेकरून यूपीआय प्रणालीवर येणारा ताण कमी होईल आणि व्यवहार अधिक जलद व सुरळीत होण्याची अपेक्षा आहे.

# सुधागडातील तीन गावांमध्ये दरोडा

### मध्यरात्री थरार; सशस्त्र दरोडेखोरांनी पळवला ऐवज



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील डोंगराळ माळरान पठारावर असलेल्या हातोंड, गोंदाव आणि माठळ या गावांमध्ये दरोडेखोरांनी रविवारी (दि. २७) मध्यरात्री दरोडे टाकले. या टोळीने कोयता आणि तलवारसदृश्य शस्त्रांचा धाक दाखवत घरातील सोने, रोकड, बँक पासबुक, चेकबुक असा ऐवज पळवला. या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये प्रचंड दहशत पसरली असून स्थानिक पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

सुरुवातीला गोंदाव येथील एका घरात चोरी करून दरोडेखोरांनी हातोंड गाव गाठले. तेथे चव्हाण कुटुंबियांनादेखील धमकावत लूटमार केली. या दरम्यान, गावकऱ्यांनी जांभूळपाडा पोलिसांना माहिती दिली, मात्र पोलीस पोहचण्यापूर्वीच दरोडेखोर पुढच्या गावात दरोडा टाकत होते, ज्यामुळे पोलिसांना पाठलाग करणे आव्हानात्मक ठरले. पोलीस उपअधीक्षक अभिजित शिवतारे, उपविभागीय अधिकारी रवींद्र दौडकर, पाली पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर तसेच स्थानीय गुन्हे शाखेची टीम, दंगल नियंत्रक पथक यांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे.

## अलिबागमध्ये गुटखा, ड्रग्ज जप्त; दोघे अटकेत

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग पोलिसांनी दोन ठिकाणी केलेल्या कारवाईत एक लाख १६ हजारांचा गुटखा आणि चरससदृश अमली पदार्थ जप्त करत दोघा आरोपींना अटक केली आहे. ही कारवाई अलिबाग शहरातील हरीष बेकरीसमोरील रोडवर आणि वायशेत येथे करण्यात आली.

नकुल कुमार नंदलाल चौरसीया (रा. अंबरनाथ, मूळ रा. उत्तर प्रदेश) याला अलिबाग शहरातील हरीष बेकरीसमोरील रोडवर एका गाडीत गुटख्यासह ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातून ६२ हजारांचा विविध प्रकारचा पानमसाला, तंबाखू आणि एक पांढऱ्या रंगाची कार जप्त करण्यात आली. तपासादरम्यान नकुल कुमार याने राम केवल रामप्रसाद निशाद (रा. वायशेत, ता. अलिबाग, मूळ रा. उत्तर प्रदेश) याला गुटखा विकल्याचे समोर आले.

पोलिसांनी राम केवल निशादच्या वायशेत येथील राहत्या घरावर छापा टाकून त्याच्या ताब्यातून विविध प्रकारचा विमल पानमसाला, राज निवास सुगंधित पान मसाला, तंबाखू आणि विशेषतः काळ्या उग्र वासाच्या चरससदृश गोळ्या असा एकूण ५४ हजार ५९१ रुपये किमतीचा माल जप्त केला.

या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दोन्ही आरोपींनी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा आणि अमली पदार्थ, मानवी जीवितास अपायकारक असल्याचे माहीत असूनही स्वतःच्या फायद्यासाठी विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्याचे निष्पन्न झाले आहे. या संदर्भात पोलीस अधिक तपास करीत आहेत.




**श्रावण सुरू झाला की, कविमन आपोआपच श्रावणधारांसारखं बहरू लागतं. नवनवीन कल्पना त्यांच्या डोक्यातून बाहेर पडतात आणि मग दरवर्षी पावसावरील कवितांचा जणू पाऊसच पडतो. यासाठी आम्ही सर्व कवींना आग्रहानं निमंत्रित करीत आहोत. मग विचार कसला करता, उचला आपली लेखणी आणि लिहा पाऊस कविता. आम्ही त्यास यथायोग्य प्रसिद्धी देऊ...**

**श्रावण संपेपर्यंत आपण स्वत: शब्दबद्ध केलेल्या कविता 'रामप्रहर'मध्ये दररोज एक या प्रमाणे (एका कवीची एकच कविता) प्रसिद्ध करण्यात येणार आहे.**

**कवींनी आपली अप्रकाशित कविता स्वत:च्या छायाचित्रासह 'रामप्रहर'कडे टाईप करून पाठवावी. त्या कवितेला 'श्रावणधारा' या सदराखाली यथायोग्य प्रसिद्धी देण्यात येईल.**

**-मुख्य संपादक**

**पत्ता : दै. रामप्रहर, अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल ४१०२०६, रायगड.**
E.mail : ramprahar@gmail.com
**व्हॉट्सॲप क्रमांक ७७३८१०६००९**



उरण : नागपंचमी येत्या मंगळवारी असल्याने बाजारात मातीचे नाग विकायला आले आहेत. पारंपरिक पुजेसाठी लोक त्याची खरेदी करताना दिसत आहेत. (छाया : दिनेश पवार)

# बोरघाटात पुन्हा दरड कोसळली

## शिंग्रोबा मंदिराजवळील घटना

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील बोरघाटातील शिंग्रोबा मंदिर जवळील झोपडी खाली दरड कोसळली, झोपडीमधे शिंग्रोबा मंदीराचे २ पुजारी रहात होते. पुजारी यांना दगड व मातीचा आवाज आला असता ते झोपडीच्या बाहेर आल्यावर क्षणार्धात दगड मातीचा मळवा कोसळून झोपडी गाडली गेली.

सुदैवाने या प्रसंगाने कोणत्याही प्रकारची जीवीत हानी झाली नाही. मात्र पुजारी यांचे राहत असलेले घर कोसळले दोन पुजारी बालंबाल बचावले. खोपोली पोलीस निरिक्षक सचिन हिरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.



शुक्रवारी मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर बोरघाटातील अमृतांजन पुला जवळ मुंबई लेनवर सायंकाळी ही महाकाय दरड कोसळून मुंबई मार्गे पूर्ण ठप्प झाले तर वाहनांच्या ५ किलोमीटर पर्यंत रांगा लागल्या होत्या खंडाळा गावापर्यंत या वाहनांची लांबच लांब रांग लागली होती या घटनेत ही जिवीत वा वित्त हानी झाली नव्हती, पण वाहतूक ठप्प झाली होती.

# बेपत्ता तीन मच्छीमारांचा शोध सुरूच

**अलिबाग : प्रतिनिधी**

खांदेरी किल्ल्याजवळ शनिवारी उरण येथील एक मासेमारी बोट बुडाली होती. यातील तीन मच्छीमार अद्यापही बेपत्ता आहेत. तीघांचाही शोध अद्यापही सुरूच असल्याची माहिती मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांनी दिली.

उरण तालुक्यातील करंजा येथील मनोहर गणपत कोळी यांच्या मालकीची तुळजाई नावाची मच्छीमार बोट शनिवारी मासेमारी साठी गेली होती. वादळी वारे आणि उसळणाऱ्या लाटांमुळे ही बोट खांदेरी किल्ल्याजवळ आली असता ही बोट लाटांच्या जोरदार माऱ्याने बुडाली. यावेळी बोटीवर एकूण ९ खलाशी होते, त्यातील पाचजणांनी ९ तास पोहत किनारा गाठला. मात्र नरेश राम शेलार, धीरज कोळी आणि मुकेश यशवंत पाटील हे तिघे खलाशी बेपत्ता आहेत.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस, महसूल आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने तीघांची शोध मोहीम सुरू केली, तटरक्षक दलाचीही मदत घेण्यात आली. ड्रोन कॅमेऱ्यांचा मदतीने संपुर्ण अलिबाग किनार पट्टीवर शोध मोहीम राबविण्यात आली. स्थानिक ग्रामपंचायतीकडून किनाऱ्यावर पाहणी करण्यात आली. मात्र रविवारी संध्याकाळ पर्यंत तिघांचाही शोध लागला नसल्याचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी सांगीतले.

दरम्यान बोटीतून बचावलेल्या हेमंत बळीराम गावंड रा. आवरे, संदीप तुकाराम कोळी रा. करंजा, रोशन भगवान कोळी रा. करंजा, शंकर हिरा भोईर रा. आपटा, कृष्णा राम भोईर रा. आपटा या पाच जणांवर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थीर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

कोकण किनारपट्टीवर सध्या मासेमारी बंदी लागू आहे. समुद्र खवळलेला आहे. अमावस्येनंतर समुद्राला मोठी उधाणेही येत आहेत अशा परिस्थितीत ही बोट मासेमारीसाठी कशी गेली, स्थानिक मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी तसेच मच्छीमार सोसायटीने त्यांना अटकाव का केला नाही असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

# वाशी येथे डेब्रीज टाकणाऱ्या दोन डंपरवर सिडकोकडून कारवाई

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सिडको महामंडळाच्या भूमीवर अनधिकृतपणे डेब्रीज टाकणाऱ्यांविरुध्द सिडकोने मोहीम अधिक तीव्र केली आहे. त्यानुसार मुंबईहून नवी मुंबई मध्ये बेकायदेशीरपणे डेब्रिज वाहून नेणाऱ्या २ डंपरवर वाशी टोलनाका येथे कारवाई करण्यात आली.

सिडको महामंडळाने संपादित केलेल्या व करण्यात येत असलेल्या जमीनीवर मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे डंपर वाहन चालकाकडून डेब्रीज टाकण्यात येत आहे. सदरचे डेब्रीज हे मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असल्याचे निदर्शनास आले आहे,

या वेळी वाशी टोलनाका येथे पथक गेले असता त्यांना दोन डंपर आढळून आले. पोलिसांना पाहून चालक डंपर रोडवर सोडून पळून गेले. डंपरचालक ईश्वर दिनु महतो आणि जलील फरदीन चुंगीवाले त्यांच्या विरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे. आरोपी हे डंपर मधील डेब्रीज नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात व जासई, उलवे परिसरात खाली करण्यासाठी जाण्याच्या प्रयत्नात होते.

# पाताळगंगा नदी पूजन आणि श्रावणी हळदीकुंकू; सहज सेवा फाऊंडेशनचा उपक्रम

**चौक, रसायनी : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदीचे पूजन,आरती, महिलांसाठी श्रावणी हळदीकुंकू आणि महिलांचा वाढदिवस साजरा करून सहज सेवा फाऊंडेशन यांनी अनोखा उपक्रम राबविला आहे. यावेळी लकी ड्रॉद्वारे महिलेला पैठणी देण्यात आली.


खोपोली हद्दीतून वाहणाऱ्या पाताळगंगा नदीप्रती कृतज्ञता भाव व्यक्त करण्यासाठी तसेच नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी जन जागृती म्हणुन सहज सेवा फाउंडेशन द्वारा नदी पुजन व आरती साजरी केली जाते. नागरिकांनी या उपक्रमास भरभरून दाद देण्यास सुरुवात केली आहे.या नदी पूजन व आरती निमित्ताने यावर्षी महिलांसाठी सामूहिक श्रावणी हळदी कुंकू कार्यक्रमाचे आगळेवेगळे आयोजन करण्यात आले होते. गगनगिरी आश्रम,खोपोली येथे आगळावेगळा उपक्रम साजरा झाला

यावेळी विविध खेळांच्या माध्यमातून महिलांसाठी आकर्षक बक्षिसे देण्यात आली. तसेच पर्यावरणाचे भान ठेवून महिलांना वाण स्वरूपात प्रत्येकी सीड बॉल व कापडी पिशवी भेट देण्यात आली. ऑगस्ट २०२५ पासून खोपोली नगरपरिषद विभागातील महिलांचा वाढदिवस प्रत्येक महिन्यातील चौथ्या शनिवारी नदीपूजनाच्या वेळी सामूहिकपणे साजरा करण्यात येणार असून त्यावेळी एक लकी ड्रॉ काढण्यात येणार आहे.सदर लकी ड्रॉ काढण्यासाठी ज्या महिलांचा वाढदिवस आहे,त्यांनी अथवा त्यांच्या परिचयातील व्यक्तीने वाढदिवसाची माहिती असलेला फॉर्म भरून देणे आवश्यक आहे, अशा नवीन महिला उपक्रमाची घोषणा करण्यात आली.

या उपक्रमासाठी आनंद शाळा, खोपोली,प.पु.गगनगिरी महाराज आश्रम, खोपोली,आर. टी. झवेरी ज्वेलर्स खोपोली,सद्गुरू ग्राफिक्स, खोपोलीयांचे विशेष सहकार्य लाभले. सदर उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहज सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, महिला अध्यक्षा निलम पाटील, सचिव अखिलेश पाटील, खजिनदार संतोष गायकर, सह सचिव नम्रता परदेशी, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, खालापूर तालुका प्रमुख मोहन केदार, सल्लागार नरेंद्र हर्डीकर, प्रकल्प प्रमुख सीमा त्रिपाठी, कल्याणी साखरे, वेदा साखरे, हितेश राठोड सोबत जीनी सॅम्युअल, संदीप दुबे, अंजली शर्मा, संगीता शुक्ला, सुनिता चव्हाण,दमयंती कोळी, मुस्कान सय्यद, निलम समेळ, रंजन चौधरी यांनी अथक परिश्रम घेतले.

सहज सेवा फाउंडेशनच्या महिला विभागाद्वारे वाढदिवस असणाऱ्या महिलांचा लकी ड्रॉद्वारे नदी किनारी नदी आरती व पुजन हा उपक्रम समाजासाठी वेगळी दिशा देणारा ठरत आहे. महिलांसाठी प्रभावी व प्रेरणादायी उपक्रम राबविणाऱ्या सर्व महिला पदाधिकारी कौतुकास पात्र आहेत असे गौरवोद्गार जीनी सॅम्युअल यांनी व्यक्त केले.





**पनवेल : मन की बात कार्यक्रमात रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या यशोगाथा उलगडल्या. खेळ, विज्ञान, संस्कृती आणि आत्मनिर्भर भारत याबाबत प्रेरणादायी विचार मांडले. 'युनेस्को'ने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसास्थळाचा दर्जा दिला ही केवळ महाराष्ट्रासाठी नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी गौरवाची बाब आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान मोदींनी काढले. डोंबिवली मोठा गाव येथील राजू भोईर यांच्या निवासस्थानी मन की बात कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण पाहताना भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण राहुल दामले यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि डोंबिवलीकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत हा क्षण अधिक विशेष केला.**

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाची पुनर्रचना; बेलापूर नवे परिमंडळ

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईतील झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, नागरीकरण आणि कायदा-सुव्यवस्था या आव्हानांचा विचार करुन महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाची पुनर्रचना करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार विद्यमान परिमंडळ-१ (वाशी) आणि परिमंडळ-२ (पनवेल) यांच्या पुनर्रचनेतून नवे परिमंडळ-२ (बेलापूर) स्थापन करण्यात येणार आहे. यानंतर आयुक्तालयात वाशी, बेलापूर आणि पनवेल अशी तीन पोलीस उपायुक्त परिमंडळे कार्यरत राहतील. याबाबतचा जीआर राज्याच्या गृह विभागाने २३ जुलै रोजी प्रसिध्द केला आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाची स्थापना १९ नोव्हेंबर १९९४ रोजी, परिमंडळ-५ (ठाणे शहर) मधील तुर्भे, वाशी, नेरूळ, उरण, न्हावाशेवा, पनवेल शहर, तळोजा आणि कळंबोली या एकूण ८ पोलीस ठाण्यांचा समावेश करुन करण्यात आली होती. त्यानंतर १५ जून २००६ रोजीच्या शासन अधिसुचनेनुसार पोलीस अधीक्षक, रायगड आस्थापनेवरील पनवेल तालुका पोलीस ठाणे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात वर्ग करण्यात आले. त्या काळी पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ-१ आणि परिमंडळ-२ तसेच पनवेल, पोर्ट, तुर्भे आणि वाशी अशी ४ सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालये कार्यरत होती. सध्या नवी मुंबई आयुक्तालयाचे कार्यक्षेत्र सुमारे ६८८ चौरस कि.मी. पेक्षा जास्त असून लोकसंख्या सुमारे ५८ ते ६० लाखाच्या दरम्यान आहे.

नव्या निवासी संकुलांपासून औद्योगिक क्षेत्रे, शैक्षणिक संस्था, बंदरे आणि वाढती वाहतूक यांमुळे पोलीस यंत्रणेवरील ताण लक्षणीयरित्या वाढला आहे. या पार्श्वभूमीवर तिसरे परिमंडळ निर्माण करण्याची आवश्यकता शासनाने मान्य केली. त्यानुसार परिमंडळ-१ वाशी, परिमंडळ-२ बेलापूर (नवे) आणि परिमंडळ ३ पनवेल अशी रचना शासनाने मान्य केली आहे.

उपायुक्त नवीन बेलापूर परिमंडळासाठी पोलीस (१) आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (२) अशी एकूण ३ नवी पदे निर्माण करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच या पदांसाठी लागणाऱ्या ३८ लाख १८ हजार ५८० रुपये इतक्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे. सदर खर्च त्या-त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात येणार आहे.

संबंधित परिमंडळ अंतर्गत पोलीस ठाण्यांची विभागणी येत्या काही दिवसात करण्यात येणार आहे. तसेच नवीन पदांसाठी मनुष्यबळ भरणे, कार्यालयीन पायाभूत सुविधा आणि बजेट वितरण यांची कार्यवाही टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे.

# आमदार मंदा म्हात्रे आयोजित मंगळागौरीच्या खेळांना प्रतिसाद



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आमदार मंदा म्हात्रे यांच्या श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्थेच्या वतीने आयोजीत मंगळागौरीचा कार्यक्रम मोठया जल्लोषात वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात साजरा करण्यात आला. यावेळी हजारो महिलांनी खेळांचा मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमामध्ये पारंपरिक वेशातील महिलांचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते. या प्रसंगी आपले वय आणि काम विसरत महिला व्यासपीठावर मंगळागौरीचे खेळ, गाणी सादर करीत असताना आमदार मंदा म्हात्रे यांनाही नाचण्याचा मोह आवरता आला नाही. मंगळागौर खेळात लाट्या बाई लाट्या, सारंगी लाट्या, फू बाई फू, अठुडं केलं गठुडं केलं अशी पारंपरिक गाणी आणि खेळ महिला खेळल्या.

यावेळी उत्कृष्ट नृत्य, पारंपरिक गायन व विविध प्रकारच्या कला दाखविणाऱ्या महिलांना विविध प्रकारची बक्षिसे देऊन सन्मानित केले. याशिवाय लकी ड्रॉच्या माध्यमातून माधुरी गोसाळकर, सारा दयानंद पाटील, रत्नप्रभा महादेव काळे या प्रत्येकीना एक एक पैठणी देऊन सन्मानित केले व मराठमोळ्या वेशभूषा महिला विजेत्याला पैठणी व आकर्षक नथ देण्यात आली. त्याच बरोबर ६७ वयाच्या नृत्य केलेल्या आजीबाई इंदुबाई वाशिवले हिला पैठणी देऊन सन्मानित केले.

यावेळी नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, काशिनाथ पाटील, दीपक पवार, माजी नगरसेविका अनिता शेट्टी, सुचित्रा पवार, ज्योती पाटील, जयश्री चित्रे, पांडुरंग आमले, विकास सोरटे, दत्ता घंगाळे, महेंद्र नाईक, प्रमोद जोशी तसेच असंख्य महिला वर्ग व कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालयात 'मनशक्ती'तर्फे यशनिश्चय दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दृढ निश्चय, ध्येय निश्चीती, मनाची एकाग्रता आणि अभ्यासातले सातत्य याद्वारे विद्यार्थी परीक्षेसह जीवनातल्या विविध क्षेत्रांमध्ये निश्चित यश प्राप्त करू शकतो या मध्यवर्ती संकल्पनेच्या आशयाने लोणावळा स्थीत 'मनशक्ती' प्रयोग केंद्राच्या वतीने येथील रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शनिवारी



(दि.२६) 'यशनिश्चय दिन' या शीर्षकाखाली उद्बोधनपर व्याख्यान झाले.

सुप्रसिद्ध कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी 'मन वढाय वढाय' या प्रख्यात रचनेतून मनाचा मोकाटपणा चित्तवेधक शैलीत उद्धृत केला आहे. अशा मनाला काबूत ठेवणे म्हणजे महा जिकिरीचे काम. अशा बेलगाम मनाला काबूत ठेवण्यासाठी आध्यात्मिक, बौद्धिक आणि वैज्ञानिक अधिष्ठानाच्या त्रिवेणी संगमाच्या माध्यमातून मनःशांती द्वारे 'मनशक्ती'चे प्रयोग प्रभावी ठरू शकतात या हेतूने विद्यालयात या समुपदेशन सत्रांचे आयोजन करण्यात आले.

इयत्ता आठवी ते दहावी, कनिष्ठ महाविद्यालय व शिक्षकवृंद अशा तिन्ही घटकांना तीन सत्रांमध्ये उद्बोधन करताना 'मनशक्ती' प्रयोग केंद्राचे मुख्य मार्गदर्शक मनोज सूर्यवंशी, विभाताई सूर्यवंशी व राजश्री आंबरें यांनी संयुक्तरित्या तीन ठिकाणी तीन टप्प्यांमध्ये विद्यार्थ्यांना समुपदेशन केले. या वेळी त्यांचे सहकारी योगिता देशपांडे, रुद्रा देशपांडे व संदेश कोळी आदी उपस्थित होते.

परीक्षेला सामोरे जाताना आपली पूर्वतयारी कशी करावी, आपली मनःस्थिती प्रसन्न कशी ठेवावी याविषयी विद्यार्थ्यांना अत्यंत सुंदर आणि समर्पक भाषेत मार्गदर्शन केले.

# पोलीस असल्याचे भासवून फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

दोन अनोळखी इसमानी पोलीस असल्याची बतावणी करून एका वृद्ध इसमाची केली फसवणूक केल्याची घटना तक्का कॉलनी येथे घडली आहे .

राधाकृष्ण मेनन ( वय ७२ ) हे तक्का येथे असताना दोन अनोळखी इसमानी पोलीस असल्याची बतावणी करून त्यांच्याकडील एक लाख वीस हजार रुपये किमतीच्या दोन सोन्याच्या चैनी त्यांची फसवणूक करून काढून घेऊन ते दोघे पसार झाले. या घटनेची नोंद पोलीस ठाण्यात करण्यात आलीय.

# इन्फिनिटी फाऊंडेशन व केएलई कॉलेजतर्फे चित्रकला कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इन्फिनिटी फाऊंडेशन आणि केएलई कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या संयुक्त विद्यमाने वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र कोकण प्रांत, विद्यार्थी वसतिगृह चिंचवली येथे विशेष चित्रकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमास इन्फिनिटी फाऊंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला, उपाध्यक्ष मिहीर रेडिज, सरचिटणीस यश दुबे, सरचिटणीस प्रणय उसाटकर, एनएसएस समन्वयक शीतल घरगे व इतर सदस्य उपस्थित होते.



या वेळी प्रशिक्षक प्रेमाश्री गजाकोस यांनी विद्यार्थ्यांना चित्रकलेचे प्रशिक्षण दिले. कार्यशाळेनंतर सहभागी विद्यार्थ्यांना भेटवस्तू आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

## दुखवटा

### गजेंद्र दळी

**अलिबाग :** येथील यशस्वी उद्योजक गजेंद्र दळी यांचे रविवार, २७ जुलै रोजी वयाच्या ९१ व्या वर्षी निधन झाले. ब्रह्मा विष्णू महेश सिनेप्लेक्सचे संस्थापक म्हणून त्यांची ओळख होती, त्यांच्या मागे पत्नी सुधा, दोन पुत्र सत्यजीत, विश्वजीत आणि सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



# ‘सीकेटी’त पर्यावरणपूरक उपक्रमाला प्राधान्य

## कागदी पिशव्यानिर्मिती कार्यशाळा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमधील ८ MAH Girls Bn, 3 MAH Boys Bn NCC Cadets करीता शनिवारी (दि.२६) कागदी पिशव्या निर्मिती या विषयावर एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश पर्यावरणपूरक पद्धतींना प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांना मूलभूत उद्योजकीय कौशल्यांनी सुसज्ज करणे हा होता.

कागदी पिशव्या निर्मिती कार्यशाळेने विद्यार्थ्यांना पर्यावरणीय जाणीव वाढवताना मौल्यवान कौशल्य शिकण्यासाठी एक आकर्षक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. दृष्टी फाऊंडेशन संस्थेचे अध्यक्ष किशोर देवधेकर सर यांनी पर्यावरणपूरक विविध प्रकारच्या कागदी पिशव्या बनवण्याचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. कागदी पिशव्या निर्मिती उद्योगासंदर्भात सखोल मार्गदर्शन केले.

ही कार्यशाळा प्राचार्य डॉ. संजय पाटील सर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. कार्यक्रमाचे आयोजन लेफ्टनंट प्रोफेसर निलिमा तिदार यांच्या संकल्पनेतून करण्यात आले.

कागदी पिशव्या तयार केल्यानंतर खांदा कॉलनी, पनवेल येथील किरकोळ दुकानात जाऊन दुकानदारांना प्लास्टिक पिशव्या न वापरण्यासंदर्भात प्रबोधन केले व पर्यावरण पूरक कागदी पिशव्या वापरण्यासंदर्भात सुचना करण्यात आली. मोफत काही कागदी पिशव्या देण्यात आल्या.

कार्यक्रमात एनसीसी सिटिओ प्रोफेसर सागर व्यवहारे, एनसीसी सिटिओ प्रोफेसर जितेंद्र पावरा, दृष्टी फाऊंडेशन संस्थेच्या सचिव नम्रता देवधेकर आदी प्रमुख उपस्थित होते.

## तारा येथे शैक्षणिक साहित्य वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पहल सामाजिक संस्था चेंबुर मुंबई यांच्या वतीने ४६ गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून शिक्षणाला पाठिंबा देण्यासाठी एक प्रशंसनीय उपक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील बानुबेन प्रवीण शाह माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आणि जिल्हा परिषद मराठी शाळा, तारा येथे पार पडला.

या कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक श्री. अरुण कदम यांनी केले, त्यांनी गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्यांची देणगी देऊन सहकार्य केल्याबद्दल पहल संस्थेच्या संचालिका डॉ. अंजना थडानी यांचे आभार मानले. पहलचे प्रकल्प समन्वयक मधुकर पुजारी, सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत, संजय म्हात्रे आणि बुधवन यांच्या उपस्थितीने हा कार्यक्रम झाला.

दोन्ही शाळांमधील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला आणि समुदाय आणि शैक्षणिक सक्षमीकरणाच्या भावनेला हातभार लावला. पहल संस्थेच्या या विचारशील उपक्रमामुळे केवळ महत्त्वाची शैक्षणिक साधनेच उपलब्ध झाली नाहीत तर विद्यार्थ्यांचे आणि शालेय समुदायाचे मनोबलही उंचावले आहे, ज्यामुळे सामूहिक सामाजिक जबाबदारीचे मूल्य अधिक दृढ झाले आहे.



## दोन महाविद्यालयांमध्ये सामंजस्य करार



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२६) कम्प्युटर सायन्स विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, वाणिज्य विभाग तसेच एमजीएम महाविद्यालय कामोठे या संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

या सामाजिक करारासाठी एमजीएम महाविद्यालयातील डॉ. पुनीत बाजपेयी (विभाग प्रमुख कम्प्युटर सायन्स व माहिती तंत्रज्ञान) व महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून दोन्ही संस्थांमधे ज्ञान–संसाधनाची देवाण–घेवाण होईल अशी हमी देण्यात आली. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाविद्यालयातील वाणिज्य, कम्प्युटर सायन्स व माहिती तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळे कोर्सेस सुरू करण्यात येतील तसेच व प्रशिक्षण देण्यात येईल.

करारासाठी कम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख प्रा. रिझवान मोमीन, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. विशाल देशमुख, माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख प्रा. राजश्री म्हात्रे आदी उपस्थित होते.

## सीकेटी महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, (स्वायत्त), राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जे. जे. ब्लड बँक, सर जे.जे. रुग्णालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त सीकेटी महाविद्यालयाच्या एन.एस. एस. विभागाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन शनिवारी (दि.२६) सेमिनार हॉल भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय, खांदा कॉलनी येथे केले.



शिबिराचे उद्घाटन भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांच्या हस्ते झाले. तद्नंतर रक्तदान शिबिरास सुरवात झाली, ज्यामध्ये रक्तदान करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, वाणिज्य शाखाविभागाचे प्रमुख डॉ. एस. बी. यादव,कला शाखा विभागाचे प्रमुख डॉ.बी. एस. पाटील, व्यवसाय अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. ए. के. दीक्षित, भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. सानवी देशमुख याचबरोबर महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

रक्तदान शिबिरात ६६ युनिट्स यशस्वीरीत्या संकलित केल्याबद्दल सर जे.जे. रुग्णालयाने एन.एस. एस. युनिटचे प्रशंसापत्र देऊन कौतुक करण्यात आले. प्रस्तूत शिबिराच्या माध्यमातून रक्तदान हेच जीवनदान हा संदेश देण्यात आला.

रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एन. एस. एस. विभागाचेअध्यक्ष डॉ. आर. व्ही. येवले, मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. व्ही. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. एस.भानुशाली,कार्यक्रम अधिकारी प्रा.एस. एस. घाडगे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. एम. भोईर, अभ्यासक्रमसमन्वयक प्रा. आर. बी. माने यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फूड केमिस्ट्री स्पर्धा उत्साहात



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२६) केमिस्ट्री विभागातर्फे एक अनोखी आणि रंजक फूड केमिस्ट्री स्पर्धा आयोजित करण्यात आली.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी केक, इडली, ताक, ढोकळा, पॅनकेक अशा विविध खाद्यपदार्थांमागील रसायनशास्त्र आणि शास्त्रीय प्रक्रिया उत्साहाने मांडल्या तसेच २४ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेत, स्वयंपाकातील विविध रासायनिक प्रक्रियांवर सखोल सादरीकरण केले. या विद्यार्थ्यांनी अन्न तयार करताना होणाऱ्या रासायनिक अभिक्रिया, किण्वन प्रक्रियेचे महत्त्व, विविध घटकांचे गुणधर्म, तापमान व अन्नाच्या चव, रंग व पोतावर होणारा परिणाम यावर अभ्यासपूर्ण माहिती दिली. या स्पर्धेचे परीक्षक महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे आणि डॉ. पूजा लांजेकर यांनी केले तसेच त्यांनी विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण सादरीकरणांचे व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे कौतुक केले.

ही स्पर्धा डॉ. नीलम लोहकरे, प्रा. रूपाली नागरेकर, डॉ. दीपिका हसीजा आणि प्रा. शुभांगी ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या झाली. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



**कामोठे : सेक्टर ३१मध्ये केके सिनेमासमोरच्या गार्डनमध्ये मोबाईल टॉवरचे काम चालू होते. भविष्यात या टॉवरमुळे व यातून येणाऱ्या अतिप्रभावी रेडिएशनमुळे लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याला धोका आहे. म्हणून स्थानिक सर्व सोसायटीचा त्यास विरोध आहे. हे काम बंद करण्यासाठी कामोठे पोलीस ठाण्यामध्ये सेक्टर ३१ व सेक्टर १८मधील ओम शिवम अर्जुन, भूमी टॉवर, बालाजी हाईट, चामुंडा सोसायटी, भूमी हार्मनी या सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी पत्र दिले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते रवी गोवारी व भाऊ भगत, भाजप सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, शिक्षक सेल अध्यक्ष मनोहर शिंगाडे, बूथ अध्यक्ष स्वप्नील पाटील यांच्यासोबत सेक्टर ३१मधील नागरिक उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज, ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा संयोजक प्रसाद हनुमंते, शहर उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, चिटणीस रूपेश नागवेकर, प्रभाग अधिक महेश सरदेसाई, सचिन नाझरे, बंटी पोवळे, प्रसाद कंधारे, सुधीर देसाई, परेश बोरकर, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ अध्यक्ष व इतर पदाधिकारी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप कार्यालयामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमासाठी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, बूथ अध्यक्ष प्रवीण मोहोकर, बाब्या जाधव, मयुरेश खिस्मतराव, भाई लोखंडे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : प्रभाग क्रमांक १९मध्ये मन की बात कार्यक्रमाचे प्रक्षेपण आयोजित करण्यात आले होते. या वेळी शक्ती केंद्रप्रमुख तथा माजी नगरसेविका दर्शना भोईर, बूथ अध्यक्ष सपना पाटील, माजी नगरसेवक जगदीश गायकर, नितीन वास्ककर, मुख्याध्यापिका क्रांती पाटील, कोमल पाटील, कविता पाटील, अरुणा पाटील, आशा तळोजकर, नीता मंजुळे, सोनल महाडीक, दळवी ताई, राजेंद्र साखरे, प्रसाद पाटील, राहुल बागडे, तन्मय गायकर, ठाकूर सर, प्रज्ञा पाटील, प्रिया पाटील आदी उपस्थित होते.**





**पनवेल : भाजप शहर उपाध्यक्ष प्रितम म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, रूपेश नार्वेकर, ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा संयोजक तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते, ओबीसी मोर्चा जिल्हा चिटणीस प्रसाद म्हात्रे, शहर चिटणीस रूपेश नागवेकर, बूथ अध्यक्ष प्रवीण मोहोकर, पत्रकार संजय कदम, सचिन नाझरे, निशांत पावसकर, परेश बोरकर, सुधीर देसाई, प्रसाद कंधारे, राजू सावंत, सागर मंगवानी आदी उपस्थित होते.**

## ट्रेडिंगच्या नावाखाली डॉक्टरची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

ट्रेडिंगमध्ये पैसे मिळवण्याचे आमिष दाखवून डॉक्टरची १० लाख ८५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

फसवणूक झालेल्या डॉक्टरचे पनवेल शहरात डेंटल क्लिनिक आहे. त्यांना इंस्टाग्रामवर श्रेया ठाकूर यांची फ्रेंड रिक्वेस्ट आली. या वेळी त्यांनी शेअरची माहिती दिली आणि त्यांना त्यांच्या प्लॅटफॉर्मवर गुंतवणूक केल्यास चांगला फायदा होईल, असे सांगितले. त्यांना व्हॉट्सअॅप ग्रुपवर अॅड केले. त्यांनी दुर्लक्ष केल्याने ग्रुपमधून काढून टाकले, मात्र पुन्हा दुसऱ्या ग्रुपमध्ये अॅड केले. या वेळी त्यांना एक लिंक पाठवून बँक खात्यावर १० हजार रुपये पाठवण्यास सांगितले. त्यांनी पैसे पाठवले आणि शेअर्स विकत घेतले. पुन्हा २० हजार गुंतवले. या वेळी त्यांना फायदा झाल्याचे दिसले. त्यांनी दहा लाख ८५ हजार रुपये ट्रान्सफर केले. त्यांनी प्रॉफिट काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पैसे आले नाहीत.

व्हॉट्सअॅपवर संपर्क केला असता प्रॉफिटवर दोन टक्के रक्कम भरण्यास सांगत होते, मात्र त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांनी पैसे भरले नाहीत. त्यांनी पैसे काढण्यासाठी प्रयत्न केले असता ते न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

# माणगावकरांचे श्रद्धास्थान संगमेश्वर मंदिर

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव हा तालुका रायगड जिल्ह्यातील आकाराने सर्वात मोठा तालुका म्हणून प्रसिध्द असला तरी प्राचीन परंपरा ब्रिटीशकालीन पूल इमारती आणि कोकणातील प्रसिध्द व्यापारी पेठ यामुळे माणगावला जास्त महत्व प्राप्त होत गेले.काळ आणि गोदनदीच्या संगमावरील माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील श्री स्वयंभू संगमेश्वर देवस्थानच्या मंदिराच्या जीर्णोद्धारामुळे व मुर्तींच्या प्राणप्रतिष्ठापनेमुळे माणगावला धार्मिकदृष्ट्या महत्व प्राप्त होत आहे.



इ.स.१६३० साली माणगावमध्ये जोगळेकर या शेतक-याचा शेत नांगरताना नांगराच्या फाळाला टणक दगड लागला व त्यातून पाणी येवू लागले. पहिल्या दिवशी जोगळेकरांनी तितकस मनावर घेतलं नाही. पुन्हा दुस-या दिवशी त्याच ठिकाणी दुध येवू लागले आणि पुन्हा तिस-या दिवशी त्या ठिकाणी रक्त येवू लागले. त्यामुळे सर्व गावात एक आश्चर्याचं वातावरण पसरू लागलं. सर्व ग्रामस्थ एकत्र जमले आणि त्या शेतातील सर्व माती काढू लागले. हळूहळू तो दगड म्हणजे एक मोठी शिवपिंड असल्याचे जाणवले. स्वयंभू शंकराने माणगावात गोद आणि काळ नदीच्या संगमावर भाविकांना दर्शन दिले होते. तेव्हापासून या स्थानाला श्री संगमेश्वर असे संबोधू लागले.

यानंतर माणगावला एका धार्मिक स्थानाच महत्व प्राप्त होवू लागले. या मंदिराच्या जवळच मारुतीचे मंदिर आहे. श्री क्षेत्र संगमेश्वर मंदिरात महाशिवरात्रीच्या दिवशी अभिषेक पूजा अर्चा नित्यनियमाने केली जाते. येथील जंगम घराण्याकडून संपूर्ण पूजा अर्चा केली जाते. माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या या संगमेश्वर मंदिरात श्रावणी सोमवार, महाशिवरात्री, संकष्टी चतुर्थी, आषाढी एकादशी, दीपोत्सव कार्यक्रमाला भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी असते. पहाटे पासून रात्री उशिरापर्यंत या मंदिरात भाविक दर्शनासाठी यादिवशी येत असतात.

सन १६३० मध्ये या संगमेश्वराने दर्शन दिल्यानंतर याच भागात त्याच्याही पूर्वीची काही कोरीव लेणी विरगळ येथे सापडली. ती अजूनही येथील ग्रामस्थांनी जपून ठेवली आहेत. त्यामधील एका मूर्तीमध्ये भाला घेवून लढणारी एक आकृती दिसते. त्यावरून येथे कोणत्यातरी राजाने फार मोठा पराक्रम केल्याचे दिसते. परंतु त्यावर तेवढा अभ्यास केलां गेला नाही किंवा ती माहिती तेवढी उजेडात आली नाही. या संगमेश्वर देवस्थानांविषयीची सनद मात्र अजूनही जंगम घराण्याकडे असल्याचे ढालघर येथी पुजारी जंगम यांनी सांगितली. परंतु ती सनद आज जीर्णावस्थेत असल्याचे समजते. त्यानंतर परकीय आक्रमणात महाराष्ट्रातील ज्या देवदेवतांची व देवळांची तोडमोड करण्यात आली. त्यात या संगमेश्वर देवास्थानाची सुद्धा तशीच अवस्था झाली. सन १९४६ सालापर्यंत या देवस्थानाची मालकी ट्रस्टी कै.हरी वामन भाटे यांचेकडे होती. समोरच दीपस्तंभ त्याचेसमोर नंदी आणि कौलारू छप्पर असलेले घरासारखे एक मंदिर म्हणून येथे भाविक आपले मनोरथ पूर्ण होण्याच्या दृष्टीने जा - ये करीत होते. कै. हरी वामन भाटे आणि कै. रामचंद्र राजाराम पाटणकर यांनी या मंदीराचे विश्वस्त म्हणून काम पाहिले. १९४६ साली त्याची रजिस्टारकडून नोंदणी करण्यात आली. ए.२७१/ कुलाबा अशी नोंदणी क्रमांक श्री संगमेश्वर देवस्थान माणगाव अशा नावाने आजही हि संस्था कार्यरत आहे. ग्रामस्थांचे हे देवस्थान संपूर्ण गावाच्या ताब्यात घेवून याचा कार्यभार सांभाळावा अशी इच्छा होती. त्याप्रमाणे कै.हरी वामन भाटे यांचेनंतर त्यांचे चिरंजीव शंकर हरी भाटे यांचेकडे गाववाल्यांनी तगादा लावला. तीन वर्षे गावकरीही मागणी करीत होते. मात्र ११ मार्च १९९७ रोजी प्रतिष्ठान ग्रामस्थ स्व.आमदार अशोकदादा साबळे यांच्या पुढाकाराने भाटे यांची परवानगी घेवून पहिली सभा झाली. भाटे यांची खात्री पटली आणि देवस्थान ग्रामस्थांच्या ताब्यात देवून त्याचा यथोचित जिर्णोद्धार होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचे ठरले. अशोकदादा साबळे यांच्या अध्यक्षतेखाली संगमेश्वर जिर्णोद्धार कमिटी स्थापली गेली. यात गावातील मराठा ब्राम्हण व विशेषतः गुजराथी मंडळी एकत्र आली रोख देणगीद्वारे आणि इतर वस्तुरूपाने देणगी गोळा करून या मंदिराचा जिर्णोद्धार झाला आहे. त्यामुळे माणगावच्या सौंदर्यात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला हे निश्चित. माणगाव तालुक्यातील कान्होजी आंग्रेकडे नोकर असलेल्या खंडोजी मापकरांचे समाधी असलेले खरवली हे ठिकाण ,वडघर येथील साने गुरुजी स्मारक, निजामपूर येथे शहाबुद्धीन खानने संभाजी महाराजांचा पराभव केला ते ठिकाण, सन १८२५ ते १८७५ हा कालखंड गाजविणारे थोर समाजसुधारक विष्णुबुवा ब्रम्हचारी हे या शिरवलीचे महादेव मल्हार, नारायण मल्हार, वामन मल्हार, जोशी या विचारवंत साहित्यिकांची हि भूमी आणि आपली राजकीय कारकीर्द लोकसभेपर्यंत नेणारे माजी मुख्यमंत्री व लोकसभा अध्यक्ष मनोहर जोशी यांची हि भूमी सा-या पर्यटकांना आकर्षण करणारी होतीच त्यात आता श्री संगमेश्वराच्या पवित्र आणि भव्य मंदिरामुळे अजूनच आकर्षित करणारी ठरणार आहे.

स्व. माजी आमदार अशोकदादा साबळे व त्यांचे मित्र कै. रवीशेठ एके दिवशी सोमवारी बेल वहायला मंदिरात आले असता समोर भली मोठी मस्जीद दिसली आणि त्याचक्षणी केवळ चाळीस उंबरठा असलेल्या वस्तीकडून एवढी चांगली इमारत बांधून होते मग आपले मंदिर आपण का करू शकत नाही या विचाराने दादांच्या मनात घर केले होते.

याच दिवशी ग्रामस्थांची मिटिंग बोलावली आणि मंदिराच्या जिर्णोद्धाराच्या विषयाला शिक्कामोर्तब केले आणि मनाने ध्यास घेतला. स्व.ताडफळे,जंगम,महेंद्र गांधी,नथुराम पारखे,उमेश शेठ,दीपक साबळे,मेथा,देवधर या आणि इतर सा-यांनी देणगीदारांनी अथक परिश्रम घेतले आणि तीन ते चार वर्षात हे भव्य दिव्य मंदिर उभ करू शकले. यासाठी पुण्याचे आर्कीटेक्ट श्री.संत यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. दादलीचे सुतार गुरुजी आरसीसी डिझायनर भिलारे यांनी आपला वेळ याठिकाणी भक्ती म्हणून दिला आणि त्यातूनच हे भव्य मंदिर स्व. दादांच्या मते एक गावाच्या विकासाचे एक केंद्र तयार झाले. या संगमेश्वर मंदिर परिसराचे सुशोभीकरण या वॉर्डाचे नगरसेवक दिनेश रातवडकर यांच्या विशेष प्रयत्नांनी करण्यात आले. या कामी त्यांना माणगाव नगरपंचायत,देवस्थान ट्रस्ट व संगमेशवर नगर वासियांनी साथ दिली. आता या मंदिराच्या माध्यमातून सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक बदल करून माणगावचा कायापालट करण्याचा निश्चय दादांनी घेतला होता.

काळ आणि गोद नदीच्या संगमावरच्या घाटाचे सौंदर्यकरण घाट ते मंदिर या नियोजित रस्त्याचे रुंदीकरण व नुतनीकरण मंदिराच्या जागेभोवती सुसज्ञ बाग मारुती मंदिर परीसराशेजारी नदीकिनारी बोटिंग क्लब नवीन कोर्टाच्या इमारतीशेजारील शैक्षणिक संकुल त्यात लॉ आणि इंजिनिअरींगचे अभ्यासक्रम असे नवनवीन प्रकल्पातून येथील पर्यटन विकास व त्या अनुषंगाने येथील नागरिकांची आर्थिक उन्नती असा प्रवास आता माझ्या उरलेल्या आयुष्यात मला करायचाय असा दादांचा दृढ निश्चय होता. दादांचे धाकटे बंधू माणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजयआण्णा साबळे यांनी याकामी लक्ष घालून संगमेश्वर मंदीर परिसर चोहोबाजून सुशोभित करून पर्यटनाच्या दृष्टीने विकसित केला आहे. याकामी त्यांना त्यांच्या सर्व सहका-यांनी विशेष साथ दिली. या मंदिर परिसरात या वर्षांपासून प्रथमच देवस्थान ट्रस्ट तर्फे अध्यक्ष संजय आण्णा साबळे,नगरसेवक दिनेश रातवडकर,संगमेश्वरनगर रहिवाशी यांच्या सहकार्याने नवरात्र उत्सव विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. संगमेश्वर मंदिर देवस्थान हे तमाम माणगावकरांचे श्रद्धास्थान असल्याने भाविक महाशिवरात्री,दीपोत्सव,श्रावणी सोमवारला मोठ्या संख्येने दर्शनासाठी मंदिरात येतात.

**-सलिम शेख, माणगाव**

## संपादकीय

# रेव्ह पार्टीचा विळखा

पुण्यात एका फ्लॅटमध्ये पोलिसांनी रेव्ह पार्टीचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी दोन तरुणींसह सात जणांना अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई आणि राष्ट्रवादी (एसपी) पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांचा समावेश समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

**सध्या समाजात वेगाने पसरत असलेला आणि विशेषत: युवावर्गाला आकर्षित करणारा एक धोकादायक प्रकार म्हणजे रेव्ह पार्टी. दिसायला चमकदार, आकर्षक आणि आधुनिक वाटणाऱ्या या पार्ट्यांच्या आड लपलेला काळोख फार भयावह आहे. यामध्ये नुसतेच नृत्य आणि संगीत नसते, तर अनेक वेळा अमली पदार्थांचे सेवन, अश्लील वर्तन, आणि कायद्याचे उल्लंघन यांचा समावेश असतो. रेव्ह पार्टी म्हणजे काय? तर या पार्टीमध्ये अनेक तरुण-तरुणी एकत्र येतात, म्युझिकवर नाचतात, झगमगाट करणाऱ्या लाईट्समध्ये स्वतःला हरवून घेतात. बऱ्याच वेळा या पार्ट्या जंगलात, फार्महाऊसवर किंवा शहरापासून लांब असलेल्या ठिकाणी आयोजित केल्या जातात. या पार्टीमध्ये सहभागी होण्यासाठी काही खास संपर्क किंवा सोशल मीडिया लिंकद्वारे आमंत्रण दिले जाते. या पार्ट्यांचा मुख्य हेतू एकत्रित आनंद घेणे असा दाखवला जात असला तरी प्रत्यक्षात अनेक वेळा त्यामध्ये ड्रग्स, मद्यपान, आणि अनैतिक कृत्ये होतात. युवावर्गाला आकर्षित करण्यासाठी 'फ्रीडम', 'बिनधास्तपणा', 'एक्सप्लोरेशन' अशा शब्दांचा वापर केला जातो. सुरुवातीला फक्त मनोरंजनासाठी सहभागी झालेल्या व्यक्ती नंतर या व्यसनांच्या आहारी जातात आणि त्याचे गंभीर परिणाम त्यांच्या आयुष्यावर होतात. माध्यमांमध्ये आणि पोलीस कारवायांमध्ये अलीकडे अशा अनेक रेव्ह पार्टी उघडकीस आलेल्या आहेत. अमली पदार्थांसह अनेक सेलिब्रिटी, प्रतिष्ठित कुटुंबातील मुले आणि उद्योगपतींची नावे समोर आली आहेत. त्यामुळे या गोष्टी केवळ सामान्य लोकांपुरत्या मर्यादित नाहीत, तर उच्चभ्रू वर्गात या प्रकाराने मुळे घट्ट रोवली आहेत. रेव्ह पार्टीत ड्रग्स आणि मद्यपानाच्या सवयीमुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. बेकायदेशीर पदार्थांचा साठा व वापर केल्याने गुन्हेगारी कारवायांमध्ये अडकण्याची शक्यता असते. घरच्यांपासून लपवून काहीही केल्याने विश्वास संपतो आणि नातेसंबंध बिघडतात. शिक्षण आणि करिअरचे नुकसान होते. एकदा व्यसन लागल्यावर करिअरकडे दुर्लक्ष होते. पालकांनी आपल्या मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद ठेवणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि समाजात व्यसनमुक्ती आणि सोशल मीडियाच्या चुकीच्या प्रभावांबद्दल जनजागृती केली पाहिजे. रेव्ह पार्टी हा आजचा फॅशनेबल वाटणारा, पण विकृतीकडे नेणारा प्रकार आहे. आता तर याचे फॅड शहरात पसरले असून भर वस्तीत अशी पार्टी झाल्याचे पुण्यातील घटनेने उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे राजकीय पक्षाशी संबंधित नेत्यांच्या सदस्याचा यात समावेश समोर आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. आता नेमके खरे काय आणि खोटे काय हे पोलीस तपासात समोर येईलच, पण सापडलेले पुरावे आणि जप्त केलेले साहित्य पाहता मामला गंभीर आहे. खरंतर समाजाने विशेषत: तरुणाईने सजग राहून या विळख्यात अडकण्यापासून स्वतःला आणि इतरांना वाचवले पाहिजे. यासाठी एकत्रित प्रयत्न आणि सकारात्मक जीवनशैलीचा स्वीकार हा एकमेव मार्ग आहे. अन्यथा धोका अटळ आहे.**



## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोन तुमची प्रत्येक गोष्ट ऐकतोय!

कल्पना करा, तुम्ही तुमच्या मित्रासोबत बसून एसी, फ्रिज किंवा ब्रँडेड कपडे खरेदी करण्याबद्दल बोलत आहात. लवकरच, तुमच्या स्मार्टफोनवर या गोष्टींच्या जाहिराती दिसू लागतात. तुम्हाला आश्चर्य वाटते, तुम्ही कोणतीही वेबसाइट शोधली नाही किंवा भेट दिली नाही, मग अचानक या जाहिराती कशा दिसू लागल्या?खरंतर याचे उत्तर तुमच्या स्मार्टफोनमध्येच दडलेले आहे. स्मार्टफोन फक्त तुमचा स्पर्शच ऐकत नाही तर तुमचा आवाज देखील ऐकतो.



जोपर्यंत त्याचा गैरवापर होत नाही, तोपर्यंत ते सामान्य वाटते. पण जर तुमचे वैयक्तिक संभाषण देखील रेकॉर्ड होऊ लागले, तर ते तुमच्या गोपनीयतेसाठी मोठा धोका बनू शकते. म्हणून, स्मार्टफोनच्या त्या सेटिंग्ज ओळखणे आणि त्या वेळीच बंद करणे महत्वाचे आहे. यामुळे तुमची गोपनीयता अबाधित राहील आणि तुम्ही अवांछित जाहिराती टाळू शकाल.

स्मार्टफोन तुमचे संभाषण नेहमीच ऐकत नाही. हो, जर तुम्ही एखाद्या ॲपला मायक्रोफोन परवानगी दिली असेल. किंवा 'हे सिरी', 'ओके गुगल' सारखे व्हॉइस असिस्टंट फोनमध्ये चालू असतात. ही वैशिष्ट्ये पार्श्वभूमीत काही सेकंदांसाठी आवाज ऐकतात, परंतु जेव्हा कमांड ट्रिगर केली जाते तेव्हाच सक्रिय होतात.आपला स्मार्टफोन आणि इतर डिजिटल उपकरणे वापरकर्त्यांचा अनुभव सुधारण्यासाठी आणि जाहिराती अधिक संबंधित बनवण्यासाठी अनेक प्रकारचा डेटा गोळा करतात.

एखादे ॲप आपले संभाषण ऐकत आहे की नाही हे आपण कसे ओळखू शकतो?

सर्वप्रथम, तुम्ही वापरत असलेल्या ॲपची मायक्रोफोन परवानगी तपासा. बहुतेक स्मार्टफोन ॲप्स इन्स्टॉलेशनच्या वेळी मायक्रोफोन ॲक्सेस करण्याची परवानगी मागतात, त्यावेळी घाईघाईत आपण त्याकडे दुर्लक्ष करतो आणि त्याला परवानगी देतो. म्हणून, ॲप्सचे गोपनीयता धोरण वाचले पाहिजे कारण त्यात ॲप तुमचा डेटा कसा वापरू शकते हे सांगितले आहे. काही ॲप्स असा पर्याय देखील देतात की तुम्ही तुमचा आवाज रेकॉर्ड करणे थांबवू शकता. जर तुम्ही मायक्रोफोन ॲक्सेसला परवानगी दिली असेल तर तांत्रिकदृष्ट्या ॲप नियमांमध्ये आहे. परंतु जर रेकॉर्डिंग परवानगीशिवाय होत असेल तर ते कायद्याचे उल्लंघन आहे.

# नाटककार बाबुराव गोखले

ज्येष्ठ नाटककार बाबुराव गोखले यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म १५ सप्टेंबर १९१६ रोजी झाला. जन्मभर बाईडींग आणि वृत्तपत्र विक्रीत रमलेल्या बाबुरावांना खाण्याचा, पळण्याचा, चालण्याचा, व्यायामाचा, अघोरी वाटाव्या अशा गोष्टी करण्याचा छंदच होता. रोज पहाटे साडेतीनला उठून, कात्रज, खेड-शिवापूर करत, कल्याण दरवाजामार्गे सिंहगडावर चढून, खडकवासला, मार्गे सकाळी नऊला दुकानात परतत. काही काळ रोज लोणावळ्यापर्यंत पायी जात. पुढे दर रविवारी सायकलवरून खोपोलीपर्यंत जाण्याचा नेम चुकला नाही.



## निमित्त

पुणे ते कराची सायकल फेरी करून जद्दबाई, हुस्नबानू, बेगमपारोचे मनमुराद गाणे ऐकले आहे. बाबुराव स्वत: तबला वाजवत. गंधर्वांची गाणी तोंडपाठ हे कळल्यावर नर्गिसच्या आईने जद्दबाईने त्यांना कराचीत थांबवून त्यांच्याकडून गंधर्वांची गाणी शिकून घेतली.

सयाजीराव गायकवाडांच्या मदतीने १९३६ साली ते बर्लिन ऑलिंपिकपर्यंत पोहोचले. पायात चप्पल-बूट काही न घालता, ४० मैल पळू शकतात, हे पाहून दस्तूरखुद्द हिटलरने त्यांना जर्मनीत चार दिवस मुक्त भटकण्यासाठी, हवे ते खाण्यासाठी पास दिला. बडोद्याच्या महाराजांमुळे लंडनलाही गेले. स्वागताला तीन-चार गव्हर्नर्स गाड्यांसह हजर. पुण्यात पेपर विकणार्या गोखल्यांच्या स्वागताला एवढे गव्हर्नर्स आत्मीयतेने कसे जमले, असा प्रश्न सयाजीराव महाराजांना पडला. उत्तर मिळाले. दर पावसाळ्यात पुणे मुक्कामी येणार्या गव्हर्नरला मराठी-हिंदी भाषा आणि क्रॉसकंट्री शिकवायला बाबुराव जात असत.

पर्वती चालत कुणीही चढेल. बाबुराव हातावर शीर्षासन करत पायर्या चढत. बायकोला पाठुंगळी घेऊन ४३ वेळा पर्वती सर केलीय. क्रॉसकंट्री स्पर्धेचे २५७ बिल्ले जिंकणार्या गोखलेंना काका हलवाई एक शेर दूध, एक शेर पेढ्याचा खुराक देत. महाराष्ट्र मंडळाच्या पैजेच्या जेवणात ९० जिलब्यांचे ताट सहज फस्त करत. वयाची शंभरी ओलांडल्यावरही बाबुराव रोज १५ पोळ्या रिचवू शकत होते. त्यांनी आपल्या डझनभर नाटकांनी प्रेक्षकांना खळखळून हसवले. त्यात 'करायला गेलो एक' हा मास्टरपीसच. 'अन झालं भलतंच','रात्र थोडी सोंगं फार', 'नाटक झाले जन्माचे', 'झालं गेलं गंगेला मिळालं', 'संसार पाहावा मोडून', 'थांबा थांबा घोळ आहे', 'पुत्रवती भव', 'पेल्यातील वादळ' ही नाटके नावापासूनच नाट्यमय ठरली.

बाबुरावांनी अनेक नाटके लिहिली, सादर केली. त्यासाठी 'थ्री स्टार्स' ही कंपनी स्थापन करून अनेक उत्तम नाटके दिली. दिग्दर्शक, निर्माते, प्रमुख भूमिका, पार्श्वसंगीत, म्युझिक सेट्स तयार करणे या सगळ्यांत अग्रेसर असणारे बाबुराव मनाने अगदी हळवे होते. बाबुरावांनी अनेक भावगीते लिहिली, परंतु गजानन वाटवे यांनी गायलेले आणि दत्ता डावजेकर यांनी संगीत दिलेले 'वारा फोफावला..' हे गीत फार गाजले. इतके की,'वारा फोफावला'चे बाबुराव गोखले असेच त्यांना ओळखले जाऊ लागले. 'नाखवा वल्हव वल्हव..' हे त्यांचे गीतसुद्धा त्या वेळी लोकप्रिय झाले होते. अशा या महान नाटककाराचे २८ जुलै १९८१ रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# दररोज ३० मिनिटे अनवाणी चालण्याचे फायदे

तंदुरुस्त राहण्यासाठी लोक सहसा चालणे आणि जॉगिंगचा अवलंब करतात. पण तुम्हाला माहिती आहे का की अनवाणी चालणे देखील आरोग्यासाठी फायदेशीर आहे? आरोग्य सुधारण्याचा हा एक अतिशय सोपा आणि मोफत मार्ग आहे.दररोज अनवाणी चालणे याला इंग्रजीत बेअरवेट वॉकिंग म्हणतात. मधुमेहाच्या रुग्णांना गवतावर अनवाणी चालण्याचा सल्ला दिला जातो.जर तुम्ही दररोज फक्त ३० मिनिटे गवतावर किंवा जमिनीवर अनवाणी चाललात तर तुमचे शारीरिक आरोग्य सुधारतेच पण मानसिक ताणही बऱ्याच प्रमाणात कमी होतो.चला तर मग जाणून घेऊया दररोज ३० मिनिटे अनवाणी चालल्याने शरीरात कोणते बदल होतात आणि त्यामुळे आपल्याला कोणते फायदे होतात. याबद्दल जाणून घेऊया.



१. झोप आणि मनःस्थिती सुधारते

अनवाणी चालण्याने शरीर पृथ्वीच्या संपर्कात आल्यावर त्यातून बाहेर पडणारी ऊर्जा (पृथ्वीचे नैसर्गिक इलेक्ट्रॉन) मेलाटोनिन (झोप नियंत्रित करणारे संप्रेरक) आणि सेरोटोनिन (मूड स्थिर करणारे संप्रेरक) यांचे संतुलन राखते.जर तुम्ही दररोज ३० मिनिटे अनवाणी चाललात तर मन शांत राहते, ज्यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते आणि मूड देखील चांगला राहतो.

२. चिंता आणि ताण कमी करते

दररोज अनवाणी चालल्याने मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. जेव्हा तुम्ही अनवाणी चालता तेव्हा शरीरात जमा झालेले इलेक्ट्रोमॅग्नेटिक चार्ज बाहेर पडते आणि त्यामुळे कोर्टिसोलची पातळी (तणाव संप्रेरक) कमी होते.

३. लवचिकता वाढवा

शूज घालल्याने आपले पाय नेहमीच सारख्याच प्रकारे हालचाल करतात, परंतु अनवाणी चालल्याने पायाच्या स्नायू, अस्थिबंधन आणि घोट्यांची हालचाल सुधारते. यामुळे शरीराची लवचिकता वाढते आणि सांधेदुखी, कडकपणा आणि स्नायूंच्या घट्टपणापासून आराम मिळतो.

४. रक्ताभिसरण आणि हृदयाचे आरोग्य सुधारते

जेव्हा पायांची त्वचा जमिनीशी थेट संपर्कात येते तेव्हा रक्त प्रवाह सुधारतो. यामुळे हृदयाला पंप करणे सोपे होते. उच्च किंवा कमी रक्तदाबाच्या समस्या संतुलित होतात आणि पायांच्या नसांमध्ये ऑक्सिजनचा प्रवाह सुधारतो.

# माथेरान घाटात मोठा दगड कोसळला



सुदैवान जीवितहानी नाही; वाहतुकीस मात्र अडथळा

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान घाट रस्त्यात भला मोठा दगड डोंगर कपारीतून निखळून थेट रस्त्यावर कोसळला आहे. सकाळच्या सुमारास घडलेल्या या दुर्घटनेने कुठलीही जीवित हानी झाली नाही.परंतु माथेरान घाटात धबधब्या खाली आनंद घेण्यासाठी थांबलेल्या पर्यटकांच्या काही अंतरावर हा दगड कोसळल्याने मोठी जीवित हानी होता टळली आहे. दरम्यान रस्त्यावर पडलेल्या दगडामुळे काही काळ वाहनांना अडचणींचा सामना करावा लागला परंतु स्थानिकांनी पुढाकार घेत दगड बाजूला हटवून वाहनांना मोकळी वाट करून दिली.

आज २७ जुलै श्रावण मासातील पहिला रविवार विकेंड सुट्टी.एकीकडी मुसळधार पाऊस दुसरीकडे श्रावण मान्सूनचा आनंद घेण्यासाठी मुंबई ,ठाणे,पुणे येथून आलेल्या पर्यटकांची माथेरान घाटात गर्दी उसळली होती. धुक्याची दुलई आणि उंच डोंगरावर पांघरलेला हिरवा गवताचा शालू त्यातून वेडीवाकडी वाट काढून उंच भागावरून फेसाळून वाहणारे पांढरे शुभ्र असे धबधबे पर्यटकांचे मन मोहून घेत होते.

सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारस माथेरान घाटातील प्रसिद्ध असणाऱ्या जुमापट्टी स्थानकाच्या वरील धबधबा (वॉटरफोल) येथे काही मुंबईतील पर्यटक आपले वाहन पार्क करून भिजण्याचा आनंद घेत होती व काही पर्यटक रस्त्यावर उभे राहून थंड गार वाऱ्याचा आनंद लुटत व्हिडिओ रेकॉर्ड करीत होती.याच वेळी ओल्या मातीतील भला मोठा दगड डोंगर भागातून निखळून थेट रस्त्याच्या सुरक्षा रेलिंगवर व रस्त्यावर येऊन पडला.

यावेळी वाहनांची फार वर्दळ नसल्याने मोठा अनर्थ टळला.दगडाचे दोन तुकडे झाले होते,रेलिंग तुटून पडली होती.७० फुट उंचावरून पडलेल्या या महाकाय दगडामुळे कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी हा दगड ज्या ठिकाणी पडला त्या दहा फुटावर पर्यटक आपला आनंद लुटत होती.त्यामुळे या पर्यटकांनी डोळेच पांढरे करीत एक मोठा श्वास घेत सुटकेचा श्वास सोडला.

रस्तावर पडलेल्या दगडामुळे घाट रस्त्यात येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण झाला होता. स्थानिकांनी हा दगड बाजूला करीत वाहतूक सुरळीत केली. मान्सून काळात माथेरान घाट रस्त्यात अनेक ठिकाणी दरड कोसळण्याची भीती असल्याने काही परिसरात सुरक्षा जाळी डोंगर भागात बांधण्यात आलेली आहे, परंतू आजही अशा काही ठिकाणी या सुरक्षा जाळी बसवली न गेल्याने दरड कोसळण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याचे पुढे येत आहेत.

# पोलादपूर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत



**पोलादपूर : प्रतिनिधी**

शिवसेना अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांचे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर येथे शिवसैनिकांनी जल्लोषात स्वागत केले. महाबळेश्वरकडे जाताना माणगाव महाड व पोलादपूर मार्गे उपमुख्यमंत्री शिंदे यांचा दौरा जाहीर झाल्याने शिवसैनिकांची सकाळपासून पोलादपूर प्रभात नगर पूर्व येथील सर्व्हिस रोड व राष्ट्रीय महामार्गालगत गर्दी जमली होती. यावेळी शिंदे यांच्या वाहनात त्यांच्यासमवेत राज्याचे रोजगार हमी योजना, खार जमीन व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले हेदेखील होते.

पोलादपूर येथे रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, ज्येष्ठ शिवसैनिक दशरथ उतेकर, शहरप्रमुख सुरेश पवार, नगराध्यक्षा शिल्पा दरेकर, उपनगराध्यक्ष प्रसाद इंगवले, स्थानिक सभापती निखील कापडेकर, बांधकाम सभापती सिध्देश शेठ, नगरसेविका स्नेहल मेहता, शहरातील ज्येष्ठ शिवसैनिक दीपक हरीभाऊ उतेकर तसेच स्विकृत नगरसेविका मृगया शहा आणि शिवसेनेचे विविध पदाधिकारी आणि महिला शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी चंद्रकांत कळंबे यांच्यासह तालुकाप्रमुख निलेश अहिरे, ज्येष्ठ शिवसैनिक दशरथ उतेकर, लक्ष्मण मोरे, रामदास कळंबे, प्रकाश दळवी नगराध्यक्षा शिल्पा दरेकर तसेच अन्य पदाधिकारी शिवसैनिकांनी महापुष्पहार व शाल अर्पण करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत केले

# माजी सैनिकांचा युद्धवीर म्हणून सत्कार



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील माजी सैनिक सामाजिक संस्थेचा तृतीय वर्धापन दिन शहरातील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात पार पडला. यावेळी सेवेतून निवृत्त झालेल्या माजी सैनिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात गुणवंत झालेल्या सैनिकांच्या मुलांचा गौरव करण्यात आला.

या वेळी १९६५ आणि १९७१ च्या युद्धातील युद्धवीर हरिश्चंद्र उर्फ काका म्हात्रे, १९७१ च्या युद्धाचे साक्षीदार गोवर्धन पाटील आणि हरिश्चंद्र भोईर या तीन माजी सैनिकांचा युद्धवीर म्हणून सन्मान करण्यात आला. तर सुरेंद्र ठाकूर हे आर्मी आणि महसूल विभागातून, जनार्दन म्हात्रे आर्मी आणि पोलिस दलातून, भगवान पेरवी आर्मी आणि वन विभागातून, लहू म्हात्रे आर्मी आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया मधून निवृत्त झाल्याबद्दल त्यांचा देखील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर इयत्ता १० वी,१२ वी आणि पदवीधर तसेच इतर क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या माजी सैनिकांच्या पाल्यांचा देखील गौरव करण्यात आला.

या वेळी संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र ठाकूर यांनी फक्त संस्था स्थापन करणे नाही तर आपण या देशाचे माजी सैनिक या नात्याने समाजाचे काही ना काही देणे लागतो या उद्देशाने काहीतरी योगदान म्हणून सामाजिक कार्य करण्यात आम्ही अग्रेसर राहिलो असल्याचे सांगुन वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप, रक्तदान शिबिर यांसारखे समाजोपयोगी उपक्रम राबविण्याला आम्ही प्राधान्य दिले असून आजच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आज माजी सैनिकांच्या विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणात तसेच क्रीडा क्षेत्रात उत्तम कामगिरी केली आहे त्यांचा सत्कार करण्यात आला.

# जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून पोलिसांचा सन्मान



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्यासह आठ पोलिसांचा रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी प्रमाणपत्र देऊन एनडीपीएस जप्त मुद्देमाल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की मुरुड ठाण्याच्या हद्दीत २९ जुन रोजी मुरुड पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक -विजयकुमार देशमुख व त्यांचे सहकारी रात्रीच्या वेळी गस्त घालत असताना शिघ्रे पोलिस चेक पोस्ट जवळ रात्रीच्या वेळी रस्त्यावरुन सुझुकी ग्रे रंगाची मोटारसायकल वरुन तरुण मुरुडच्या दिशेने जात असताना ट्राफीक पोलिस नाईक -किशोर बठारे यांनी व गस्त घालत असणारे पोलिसांनी त्या मोटारसायकल चालकाला अडविले आणि त्यांची झडती घेतली असता त्यांच्या गाडी च्या डिकीत ७७६ ग्राम वजनाचा चार लाख आठ हजार रुपये किंमतीचा चरस नावाच्या अमली पदार्थ आढळुन आले होते . त्यानंतर या आरोपीवर गुन्हा रजिस्टर नं.३५/२०२५ एन डी पी एस क्ट कलम ८(क)२०(ब) ।। (ब) वैगरे या कलमाखाली अटक केल्यानंतर त्यांची चौकशी केल्यानंतर

गुन्हातील आजुन ४ आरोपी कडुन ३ किलो च्या तेरा लाख ८० हजार रूपये किंमतीचा चरस नावाच्या अमली पदार्थासह अटक केले तसेच सदर गुन्ह्यातील आजुन एकुण १३ आरोपी यांना अटक केले या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलिस निरीक्षक-परशुराम कांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक- विजयकुमार देशमुख, स्थानिक गुन्हा शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक - भास्कर जाधव,पोलिस उपनिरीक्षक- अविनाश पाटील,ट्राफीक पोलिस नाईक -किशोर बठारे , पोलिस हवालदार- हरी मेंगाळ, पोलिस हवालदार -जनार्दन गदमळे ,पोलिस शिपाई -अंबिका महामुनी ,पोलिस शिपाई -प्रियंका आहेर यांना या उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

रायगडच्या पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांनी सांगितले की आपण या पुढे अशीच उत्कृष्ट कामगिरी बजावत रहाल व रायगड पोलिस दलाच्या उज्वल परंपरेत भर टाकाल अशी मला खात्री आहे. असे मत पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांनी व्यक्त केले आहे.

# आरोग्यवर्धक रानभाज्यांची श्रावण महिन्यात रेलचेल



**पाली: प्रतिनिधी**

सध्या श्रावण महिन्याची सुरुवात झाली आहे. पुष्कळ जण या महिन्यात मांसाहार करत नाहीत. जिल्ह्यातील रानावनात विविध रानभाज्या याच श्रावणात फुलतात. या विशेष हंगामात मिळणाऱ्या आरोग्यवर्धक रानभाज्यांचे सेवन केल्याने आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते. केवळ श्रावणात फुलणाऱ्या या वनस्पतींचे गुणधर्म औषधी असल्याने त्या आवर्जून खाल्ल्या जातात. शिवाय दिवसानुसार प्रत्येक भाजीला महत्व असून त्याप्रकारे त्या केल्या जातात. या रानभाज्या बाजारात उपलब्ध होत आहेत. आदिवासी महिलांना या रानभाज्या विकून चांगला रोजगार देखील मिळतो.

रानभाज्या आपोआप उगतात. कोणतेही खत किंवा कीटकनाशक न वापरता पूर्णपणे नैसर्गिक पद्धतीने उगवलेल्या या रानभाज्या म्हणजे श्रावणातील आरोग्यदायी पर्वणीच असते. रानभाज्या या औषधी असतात, त्यामुळे पावसाळ्यात आरोग्य चांगले राहते. म्हणून श्रावणात जिल्ह्यात कृषी विभाग व समाजसेवी संस्थांच्या माध्यमातून रानभाज्यांचे महोत्सव सुद्धा भरवले जातात.

श्रावण सोमवारी कौला/ कैलाच्या पानांची भाजी करतात. शुक्रवारी जिवतीच्या फुलांची भाजी, शनिवारी राजगिरा, कुर्डू, कुळी, टाकळा आणि आम्लीच्या पानांची एकत्रित पंचभेळी भाजी करतात. ऋषीपंचमीला बऱ्याच रानभाज्यांची मिळून एक मिसळ भाजी करतात. भाज्या - देठी, देवभात, भारंगी, चाव्याचा बार/ शेंडवेल, चिचार्डी, मेकी, पाथरी, कुर्डू, रानअळू. गौरी आणतात त्या दिवशी केनी व कुर्डूच्या पानांची भाजी- बैल पोळ्याला चवळीच्या पानांचे बेसन घालून मुठे करतात. वसुबारसेला गोवर्धन पूजा करताना सुरण, आळूकंद, करंदकंद आणि काशी कोहळा यांची भाजी करतात.

**रानभाज्यांचे आहारातील महत्त्व खूप आहे. शासन व कृषी विभागाने त्यांच्या विक्रीस अधिक प्रोत्साहन द्यावे. रानभाज्यांना हक्काची बाजारपेठ व हमीभाव द्यावा. जास्तीत जास्त रानभाज्या महोत्सव भरविण्यात यावा. यामध्ये स्थानिक शेतकरी, आदिवासी व महिला गटांना सहभागी करून घ्यावे. रानभाज्यांची शास्त्रशुद्ध माहिती विक्रेत्यांना द्यावी, जेणेकरून लोकांना याची माहिती मिळेल आणि विक्रीतदेखील आणखी वाढवली.**

**-तुषार केळकर,**
**प्रयोगशील शेतकरी, उद्धर, सुधागड**

कपाळफोडीच्या पानांची भाजी. जीर्ण आमवातामध्ये खाण्याची प्रथा आहे. ही भाजी आमवात या संधिवाताच्या प्रकारात गुणकारी आहे. पोट गच्च होणे, मलाविरोध सारख्या विकारात कपाळफोडीच्या भाजीने आराम मिळतो. स्त्रियांची मासिक पाळी नियमित होत नसेल तर या भाजीचा चांगला उपयोग होतो.आधुनिक शास्त्रानुसार कपाळफोडीच्या पानात अँटिबायोटिक व अँटिपॅरासायटिक तत्त्वे असल्याने जुनाट खोकल्यावर कपाळफोडीची भाजी उपयुक्त आहे.

भारंग-ही भाजी जिल्ह्यात मुबलक मिळत आहे. ही भाजी उगवल्यानंतर कोवळी असताना तोडली जाते. भारंगाची सुकी भाजी विशेष लोकप्रिय आहे. काहीजण वाल टाकून ही भाजी करतात.

करटोली-कंटोली किंवा करटोली ही भाजी कारल्यासारखी दिसते. कारल्याची भाजी करतात तशीच याची भाजी केली जाते. जिल्ह्यातील सर्व बाजारात आदिवासी महिला ही भाजी विक्रीसाठी घेऊन येत आहेत. मात्र भाव वधारले असून एक वाटा ५० रुपयांना आहे. कंटोली हे डोकेदुखी वर उत्तम औषध आहे. तसेच मधुमेहाच्या रुग्णांनी या भाजीचे नियमित सेवन केल्यास रक्तातील साखर कमी होते.

कुरडूची भाजी- कुरडूची कोवळी पाने शिजवून त्याची भाजी करतात. दमेकरी जुनाट खोकला, वृद्ध माणसांचा कफ विकार यात ही भाजी उपयुक्त आहे.कुरडूची पालेभाजीसुद्धा लघवी साफ करायला उपयोगी आहे. या पालेभाजीमुळे कफ कमी होतो. जुनाट विकारात कुरडूच्या पालेभाजीचा रस सुद्धा पितात. कुरडूच्या बिया मूतखडा विकारात उपयुक्त आहेत.

कुलुची भाजी- फोडशी किंवा कुलु किंवा काल्ला या नावाने हि रानभाजी ओळखली जाते. हि भाजी म्हणजे एक प्रकारचे गवतच असते. हि भाजी फक्त पावसाळ्यातच मिळते. इतर पावसाळी भाज्यांप्रमाणे हि चविष्ट असते. हि भाजी शाकाहारी व मांसाहारी या दोन्ही प्रकारात करता येते.

काटेमाठ-काटेमाठच्या कोवळ्या भाज्या आणि कोवळ्या फांद्या भाजीसाठी वापरतात. पावसाळ्यात ओसाड जमिनीवर, रस्त्याच्या कडेला आणि शेतात काटेमाठ ही वनस्पती आढळते.

चुका-चुक्याच्या पानांची, कोवळ्या फांद्यांची आणि खोडांची भाजी केली जाते.

## लायन्स क्लब खालापूर अध्यक्षपदी किशोर पाटील

**रसायनी : प्रतिनिधी**

लायन्स क्लब खालापूर चा इंस्टालेशनचा कार्यक्रम श्री क्षेत्र अष्टविनायक मंदिर महड येथे घेण्यांत आले.यावेळी नवीन कमिटीचा पदग्रहण सोहळा तसेच अध्यक्ष पदासाठी किशोर पाटील यांची निवड करण्यांत आली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने गुरुकुलच्या विद्यार्थ्यांना बॅग व वह्या वाटप करण्यात आले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs. 500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. : 7000037095** **Tender No. : EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-24/ 2025-2026.** RFx e-tender for Supply of various type of Nut, bolts at various substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 9,87,151/-, EMD amount Rs. 9,872/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **29.07.2025, 18:00 Hrs. to 13.08.2025, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 13.08.2025 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **14.08.2025 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in** **Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505. Note : All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(A. P. Joshi)**
**Executive Engineer, E.H.V.(O&M) Dn. Panvel**



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ३०/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... सावित्री धरण परिसरात मृदु पोलादी शिडीचा पुरवाठ करणे, चेकर प्लेट्स बदलणे, इतर फॅब्रिकेशन व इतर किरकोळ कामे करणे. | ₹ ३८,५७,४१०.०० |
| २. | पेण अलिबाग व नागोठाणे पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... पाणीपुरवठा योजनांसाठी कारखाने कायदा १९४८ नुसार आवश्यक परवाने काढणे. | ₹ १५,२५,०००.०० |
| ३. | महाड आणि विळे भागड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनात, अनिवासी व निवासी इमारतींची देखभाल व दुरूस्ती...... महाड आणि विळे भागड औद्योगिक क्षेत्रातील विविध ठिकाणच्या विद्युत उपकरणांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹ १७,१२,२९५.०० |
| ४. | अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... शुद्ध जलउदंचन गृहामध्ये टाकलेल्या लघूदाब विद्युत केबल्सना जीआरपी कव्हरसह उपकेंद्रातील खराब झालेले कुंपण बदलणे. | ₹ ३९,५०,५४५.०० |
| ५. | पाताळगंगा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. ७०० मि.मी. व्यासाच्या मृदु पोलादी जलवाहिनीची व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गेस्ट हाऊस (साखळी क्र. २४.००० कि.मी.) ते नावडे (साखळी क्र.३१.००० किमी) दरम्यानच्या ६७५ मि.मी. व्यासाच्या सीआय जलवाहिनीची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १४,६९,८२०.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक २९/०७/२०२५ ते दिनांक १२/०८/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामाबाबत दिनांक ०४/०८/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०६/०८/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक

### मित्राच्या नावाने फसवणूक

**पनवेल :** मोबाईल क्रमांकावर संपर्क करून मित्र बोलत आहे असे भासवून ४० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन अनोळखी व्यक्तींविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ७३ वर्षीय उत्तम बोराडे हे खारघर येथे राहत असून, त्यांना त्यांच्या मोबाइलवर फोन आला आणि मी वर्मा बोलत असून पुण्याचा मित्र आहे तो तुला ५० हजार रुपये पाठवणार आहे, गरज वाटेल तेव्हा मी पैसे मागून घेईन, असे बोलून फोन ठेवला. त्यानंतर त्यांना अनोळखी क्रमांकवरून ५० हजार जमा झाल्याचा मेसेज आला. समोरील व्यक्तीने पुन्हा फोन करून पैसे उकळले

### मोलकरणींनी चोरले २२ लाख रुपये

**पनवेल :** राहत्या घरात मोलकरीण म्हणून काम करणाऱ्या दोघी जणींनी मिळून बेडरूममध्ये असलेल्या बेडच्या आत ठेवलेले रोख रक्कम २२ लाख रुपये चोरून नेल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. शहरातील पटेल मोहल्ला येथे एका घरात काम करणाऱ्या दोघा मोलकरणींनी मिळून बेडरूममध्ये असलेल्या बेडच्या आत ठेवलेले रोख रक्कम २२ लाख रुपये चोरून नेले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पोलिसांकडून सायबर गुन्हे जनजागृती

## बेलापूर सीबीडी येथे कार्यक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, बेलापूर सीबीडी येथे पुण्याच्या ड्रोनशिल्ड कंपनीतर्फे सायबर गुन्हे जनजागृती व प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष सत्रामध्ये क्विक रिस्पॉन्स टीम आणि दंगा नियंत्रण पथकातील ५३ पोलीस अंमलदारांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे आयोजन पीएसआय सागर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, त्यामागील यंत्रणा आणि पोलिसांनी घ्यावयाची त्वरित पावले या विषयांवर सखोल माहिती आणि प्रात्यक्षिके देण्यात आली.

ड्रोनशिल्ड कंपनीतर्फे सारंग येरणे, अमितेश कांबळे, प्रणव पांचाळ आणि जान्हवी यांनी मार्गदर्शन केले. या सत्रात सायबर फसवणूक, सोशल मीडिया गुन्हे, डिजिटल ट्रेसिंग, डेटा विश्लेषण, मोबाईल फॉरेन्सिक आणि सायबर कायद्याविषयी महत्त्वपूर्ण मुद्दे समोर मांडले गेले.

कार्यक्रमाला उपस्थित पोलीस अंमलदारांनी सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाला उपस्थित पोलीस अंमलदारांनी सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सायबर तपासाबाबत अधिक माहिती घेण्यासाठी पुढील प्रशिक्षणाची मागणी केली. ड्रोनशिल्डतर्फे भविष्यातही विविध कायदे अंमलबजावणी यंत्रणांसाठी सायबर सुरक्षा आणि फॉरेन्सिकशी संबंधित प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जाणार असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.

# गव्हाण विद्यालयामध्ये इकोफ्रेंडली दिव्यांचे प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रतिकात्मक दीप अमावस्या उत्साहात साजरी करण्यात आली.

दीप अमावस्येचे औचित्य साधून विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या गुरूवारी (दि.२४) इको फ्रेंडली दिव्यांचे व आरती ताटांचे प्रदर्शन आणि स्पर्धेचे उद्घाटन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांचे हस्ते झाले.

स्पर्धेचे उद्घाटन करून विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी दीप अमावस्येचे महत्त्व विशद करून विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने अतिशय आटोपशीर व नेटक्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल प्रशंसोद्गार काढून दीप अमावस्येनिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. उद्घाटनावेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, वर्गशिक्षिक संदिप भोईर, ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी आदी उपस्थित होते.

**विजेते स्पर्धक**

**लहान गट :** (आकर्षक दिवे ) प्रथम : खोत अनन्या विजय, द्वितीय : ठाकूर मंजिरी किरण, तृतीय : कोळी कार्तिकी रणजीत;

**मोठा गट :** (दिव्यांसह आरतीचे आकर्षक ताट) प्रथम : ठाकूर शरयु सूर्यजीत, व्दितीय : गोंधळी श्रेया मुरलीधर, तृतीय : ठाकूर विधी शशिकांत

या वेळी कलाध्यापक गणेश भोईर यांचे दीप अमावस्येचे महत्त्व अधोरेखित करणारे फलक लेखन लक्षवेधी ठरले. तर सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर पाटील यांचे विशेष प्रयत्नही कौतुकास्पद ठरले. प्रास्तविक व सूत्रसंचालन प्रतिज्ञा घरत यांनी केले.

विद्यार्थ्यांनी स्वहस्ते तयार केलेल्या या आकर्षक आणि इकोफ्रेंडली दिव्यांमधून व आरतीच्या ताटांमधून गटनिहाय विजेते घोषीत करून मान्यवरांच्या शुभहस्ते भेटवस्तू व लेखणी देऊन अभिनंदन करण्यात आले.



# विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**



सद्‌गुरु श्री साई नारायण बाबा यांच्या आध्यात्मिक उपस्थितीत पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील साई नारायण बाबा आश्रमात हजारो शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप आज करण्यात आले.

सद्‌गुरु श्री साई नारायण बाबा यांच्या आशीर्वादाने ५० व्या वार्षिक उपक्रमाअंतर्गत आज पनवेल पंचक्रोशीतील पहिली ते आठवीतील शाळेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंसह खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमात श्री नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष खेमचंद गोपलाणी, सेक्रेटरी रामलाल चौधरी, राम थडानी, डॉ.शकुंतला भटिजा यांच्यासह शेकडो भाविकांच्या उपस्थितीत शालेय विद्यार्थ्यांना साईबाबा मंदिरामध्ये वाटप करण्यात आले. या वेळी शाळेय विद्यार्थ्यांसह शिखसक वर्ग व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### काळुंद्री नदीत आढळला मृतदेह

**पनवेल :** काळुंद्री नदीच्या किनारी, कोळखे गावाच्या



पाठीमागील बाजुस येथे नदीच्या पाण्यामध्ये तरंगताना एका व्यक्तीचा मृतदेह मिळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या अनोळखी बेवारस इसमाचे वय ३५ ते ४० वर्षे, डोक्यावर केस काळे, तोंड उघडे जिभ बाहेर, आलेली, डोळे बाहेर आलेले, दाढी काळी व बारिक वाढलेली दिसत आहेत. बांधा मध्यम, उंची अंदाजे पाच फुट सात इंच आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका झांझुर्णे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चिरनेर येथे शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजना मार्गदर्शन

**उरण : वार्ताहर**



विमा अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ असून, यामध्ये कोणत्याही प्रकारची मुदतवाढ मिळणार नाही. त्यामुळे ज्यास्तीत ज्यास्त शेतकऱ्यांनी पीक विमा काढावा, असे अहवान तालुका अधिकारी अर्चना सूळ-नारनवर केले आहे, मंडळ कृषी अधिकारी शुभम गटकळ, यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पीक विमा प्रतिनिधी अनिल तांडेल, यांनी गुरुवार (दि.२४) चिरनेर उरण येथे प्रधान मंत्री पीक विमा योजना माहिती देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

पीक पेरणी पासून ते पीक काढणीपर्यंत सर्व कालावधीत नैसर्गिक आपत्ती, कीड रोग प्रादुर्भाव इत्यादी कारणामुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे उत्पादन त्या महसूल उंबरठा उत्पादनापेक्षा कमी त्या महसूल मंडळातील विमा काढलेल्या शेतकऱ्यांना सम प्रमाणात नुकसान भरपाई मिळणार आहे. विमा प्रतिनिधी अनिल तांडेल यांनी शेतकऱ्यांना यांनी भात पीक विमा बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व विमा फॉर्म वाटप केले. या वेळी प्रफुल खारपाटील प्रगतशील शेतकरी व सहाय्यक कृषी अधिकारी चिरनेर सुषमा गायकवाड उपस्थित होते.

# कामोठे डॉक्टर्स असोसिएशनतर्फे वृक्षारोपण

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे डॉक्टर्स असोसिएशन वतीने ह्या वर्षापासून एक व्यक्ती एक वृक्ष ह्या संकल्पना अंतर्गत सुमारे ५० झाडे सेक्टर १८ कामोठे येथे लावण्यात आली.

या साठी संस्थेचे संस्थापक माजी अध्यक्ष डॉ.अरुणकुमार भगत सरानी जागा शोधून तेथे खड्डे तयार करून खूप मोलाची मदत केली. तसेच डॉक्टर्स वेलफेअर असोसिएशन पनवेल चे अध्यक्ष डॉ.शिरीष जोशी सचिव डॉ.सचिन पवार व कळंबोली डॉक्टर्स आसोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुनील कदम यांनीसुद्धा उपस्थित राहून आणि झाडे लावून आम्हांस सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष डॉ.संतोष कानगुले सचिव डॉ.राहुल जन्नैकर व उपाध्यक्ष डॉ.विजय पाटील कोशाध्यश डॉ.संतोष पांढरे यांनी केले. तसेच संस्थेचे साधारण २० सदस्य या वृक्षारोपणासाठी उपस्थित होते.



# प्रकल्प मार्गदर्शन कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज व विज्ञान महाविद्यालयात माहिती तंत्रज्ञान व कम्प्युटर सायन्स विभागाने शनिवारी (दि.२६) तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन केले होते.

या कार्यशाळेसाठी एमजीएम महाविद्यालय कामोठे येथील माहिती तंत्रज्ञान व कम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख डॉ. पुनीत बाजपेयी यांनी माहिती तंत्रज्ञान व कम्प्युटर सायन्स विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रकल्पाविषयी मार्गदर्शन केले. १ सुमारे ३६ विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश दोन्ही विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रकल्पासाठी निवडलेल्या विषयांचे नियोजन, पद्धतशीर मांडणी, व सादरीकरण करता यावे हा होता.

हा शैक्षणिक उपक्रम 'प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनात यशस्वीरित्या घेण्यात आला. आयोजन प्रा. राजश्री म्हात्रे विभाग प्रमुख माहिती तंत्रज्ञान विभाग व प्रा. रिजवाना मोमीन विभाग प्रमुख कम्प्युटर सायन्स यांनी केले तसेच दोन्हीही विभागातील इतर सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



**पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड आणि भाजप नवीन पनवेल शहर मंडळ सरचिटणीस भीमराव पोवार यांच्या प्रयत्नातून जिल्हा परिषदेच्या आसुडगाव येथील शाळेत विद्यार्थ्यांसाठी बालग्राम संस्थेचे डायरेक्टर डॉ. विनायक पाटील यांनी एक लाखाची शैक्षणिक साहित्याची देणगी दिली. या साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप नवीन पनवेल शहर मंडळ सरचिटणीस भीमराव पोवार, खांदा कॉलनीतील बालग्राम संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते अजिंक्य चंदनशिव, संस्थेचे डायरेक्टर डॉ. विनायक पाटील, मुख्याध्यापक श्रीमती धामणकर आदी उपस्थित होते.**




## आला श्रावण

**रिमझिम श्रावण**
**सरवीच्या निळ्या आठवांचा**
**बरसला निळा घन**
**पापणीत विसावतो अवखळ श्रावण**
**पापणी सजवत**
**मोहरतो लाजरा श्रावण**
**गंधवेड्या बावरीला**
**खुणावतो सखा श्रावण**
**यौवनाला शृंगारून**
**रोमा-रोमातून गातो श्रावण**
**ओल्या मातीच्या गंधाने**
**अनावर होतो श्रावण**
**सावळ्या घनामागे लपणाऱ्या सखीला**
**चिंब चिंब करतो श्रावण**
**गाण्यातील गंधार होतो श्रावण**
**झाडांना गच्च बिलगतो श्रावण**
**अनाहत प्रीतीला साद घालतो श्रावण**
**मातीच्या गर्भात बीज पेरतो श्रावण**
**श्रावण सर रिमझिम झरते**
**ओढ लाजरी मनात भरते**
**सखीच्या तळहातावर मेंदी खुलते**
**सख्या साजणा सखी पुशीते**
**आसक्तीच्या पल्याड जाऊन**
**सांग साजना माझा श्रावण होशील का?**



**-विद्या निकम, ठाणे**

# अरविंद सावळेकर यांची नियुक्ती

**पनवेल : वार्ताहर**



महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्टीज च्या रायगड जिल्हा अध्यक्षपदी बांधकामव्यावसायिक अरविंद सावळेकर यांची नियुक्ती करण्यात आली असून नुकत्याच पार पडलेल्या विशेष कार्यक्रमात माजी अध्यक्ष महेश नागराजन यांनी त्यांना पदभार दिला असून याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवनिर्वाचित रायगड जिल्हाध्यक्ष अरविंद सावळेकर यांचे विशेष अभिनंदन केले.

११ व्या वार्षिक बैठकीमध्ये व चेंज ऑफ गार्ड या कार्यक्रमामध्ये क्रेडाई या राष्ट्रीय संस्थेच्या अंगीकृत असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्टीजच्या रायगड जिल्हा अध्यक्षपदी बांधकामव्यावसायिक अरविंद सावळेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या वेळी पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाला एमसीए मेनचे अध्यक्ष डॉमिनिक रोमेल, उपाध्यक्ष शैलेश पुराणिक, सीओ केवल वालंबिया, एमसीए नवी मुंबई अध्यक्ष मदन जैन, महाराष्ट्र बिल्डर असोसिएशनचे सरचिटणीस तुकाराम दुधे, एमसीएचे माजी अध्यक्ष राजेश प्रजापती, विकास भारंबे, विलास कोठारी, अतिक खोत, किरण बागड, मधू पाटील आदी उपस्थित होते.

# एमएनएम विद्यालयात कारगिल विजय दिवस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये भारतीय सैनिकांच्या अतुलनीय शौर्याचा, त्याग, समर्पण, वीरता, पराक्रम, तसेच प्रत्येक भारतीयाच्या अभिमानाचा कारगिल विजय दिवस (२६ जुलै) साजरा करण्यात आला.

या वेळी शाळेतील माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेमध्ये देशभक्तीपर भाषणे सादर केली. शहीद सैनिकांना श्रद्धांजली अर्पण केली. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना भारतीय सैनिकांनी सीमेवर लढताना सैनिकांचे शौर्य, समर्पण, निष्ठा व देशभक्ती त्याचा उल्लेख करत शहीद जवानांना त्यांच्या पराक्रमाची विद्यार्थ्यांना माहिती देत शब्दसुमनांनी श्रद्धांजली अर्पण केली.

शाळेच्या माध्यमिक उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कारगिल विजय दिवसाबद्दल शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. शालेय सांस्कृतिक विभागाच्या सांस्कृतिक विभागाच्या वंदना जाधव, नीलम भुरे, पूजा कुमारी, शमिका कुलकर्णी यांनी कार्यक्रमासाठी विशेष प्रयत्न करत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

# कर्जत आगारातील अतिक्रमण हटवले

## तालुका प्रशासनाने आश्वासन पाळले

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-मुरबाड राज्यमार्ग रस्त्यावर कडाव गावात एसटीचे प्रवासी निवारा शेड होते. प्रवासी थांबा येथे करण्यात आलेले अतिक्रमण काढण्यात यावे अशी मागणी करून २४ जुलै रोजी उपोषण सुरू करण्यात आले होते.त्यावेळी प्रशासनाने सदर बांधकाम दोन दिवसात जमीनदोस्त करण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार शनिवारी (दि.२६) ग्रामपंचायतीकडून पोलीस बंदोबस्त घेऊन सादर तीन गाळ्यांचे अतिक्रमण हटवण्यात आले.



मागील दहा वर्षांपासून कडाव गावातील एसटी बस थांब्यावर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास येत होते. शासकीय कागदपत्रांची पूर्तता, जागेची छाननी आणि पाहणी यानंतरही संबंधित बांधकामावर कोणतीही कारवाई होत नव्हती. त्यामुळे अखेर पत्रकारांनी थेट कृतीचा निर्णय घेत बेमुदत उपोषण पुकारले. २४ जुलै २०२५ रोजी सकाळपासून कडाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या आवारात पत्रकारांनी उपोषण सुरू केल्यानंतर प्रशासनाने हस्तक्षेप करीत ग्रामपंचायत मध्ये दोन दिवसात बांधकाम जमीनदोस्त केले जाईल, असे लेखी आश्वासन दिले होते.

ग्रामविकास अधिकारी प्रेमसिंग गिरासे, सरपंच करुणा प्रमोद पवार, कर्जत एसटी आगाराचे आगार व्यवस्थापक दयानंद मोरे, महादेव पालवे, ग्रामपंचायत सदस्य सुभाष शिंदे, हर्षद भोपतराव आणि कर्जत पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बरोटे यांच्या उपस्थितीत संवाद झाला होता आणि त्यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने २६ जुलै रोजी पोलीस बंदोबस्तात सदर अनधिकृत बांधकाम हटविण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले होते.

कडाव ग्रामपंचायत कडून ग्रामपंचायत अधिकारी प्रेमसिंग गीरासे यांनी पोलीस बंदोबस्त घेऊन अतिक्रमण दूर केले. त्यावेळी काहीकाळ कडाव गावात तणाव निर्माण झाला होता, मात्र पोलिस बंदोबस्त असल्याने अनुचित प्रकार घडला नाही.

दुसरीकडे कर्जत एसटी आगार कडूनदेखील सकारात्मक भूमिका घेत तत्काळ प्रवासी निवारा शेड बांधण्यासाठी बांधकाम विभाग यांना सूचित केले आहे. त्यामुळे त्या जमिनीवर भविष्यात कोणतेही अतिक्रमण होऊ नय, अशी अपेक्षा आंदोलन करणाऱ्या पत्रकारांची आहे.

# रोह्यात हनुमान मंदिर, हायमास्ट, पथदिवे लोकार्पण

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा नगर परिषदेच्या वतीने राज्य शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास निधीमधून उभारण्यात आलेल्या हनुमान मंदिर व बीपीसीएलच्या सामाजिक दायित्व निधीतून बसविण्यात आलेल्या हायमास्ट, पथदिवे यांचे लोकार्पण खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते झाले.

राम मारुती चौकात झालेल्या या कार्यक्रमावेळी नागरिकांना संबोधित करताना खासदार तटकरे म्हणाले की, या ऐतिहासिक राम मारुती चौक परिसरात प्रभू श्रीराम व हनुमान मंदिरामुळे निर्माण होणारे भक्तीमय वातावरणामुळे ती अधिक वृद्धिंगत होणार.याचा आज मनस्वी आनंद होत आहे.



कार्यक्रमावेळी वरदाई ट्रस्टच्या अध्यक्षा वरदा तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, संतोष पोटफोडे, रत्नप्रभा काफरे, ॲड. प्रशांत देशमुख, मकरंद बारटके, मोतीलाल जैन, आनंद कुलकर्णी, अरुण करंबे, विजयराव मोरे, विनोद पाशीलकर, सरफळे रावसाहेब,अनंत जाधव, महेंद्र गुजर, महेश कोलटकर, अमित उकडे, मयूर पायगुडे, चंद्रकांत पार्टे, निलेश शिर्के, समाधान शिंदे, जितेंद्र पडवळ, जालिंदर शेवाळे, वसंत कोठारी, स्वरांजली शिर्के, समिधा सकपाळ आदी उपस्थित होते.

# खांदाड आदिवासीवाडी येथे शिक्षक-पालक सभा

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक - पालक सभा खांदाड आदिवासीवाडी येथे शनिवारी (दि.२६) झाली.

या वेळी उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेश पवार, उपाध्यक्षा तेजस्वी घर्वे, सदस्य सुनंदा काटकर, शिक्षणप्रेमी महेश महादेव पोवार, आदिवासीवाडीचे गाव अध्यक्ष अनंत पवार, महेंद्र रोंगू काटकर, सुमन दुधाराम काटकर, सावित्री रोंगू काटकर सचिन मांजरे,शशिकांत पोवार, अंगणवाडी सेविका सुवर्णा मांजरे, आशा सेविका सरीता दळवी, वैष्णवी मोरे, मुख्याध्यापिका नंदिनी वाले, सहशिक्षिका मधुरा वेदपाठक, सर्व सदस्य, पालक, ग्रामस्थ, महिलामंडळ, विद्यार्थीवर्ग यांच्या उपस्थितीत उत्साहात झाला. या वेळी दिपाली वाघमारे हिचा सत्कार करण्यात आला.



# कुणबी समाजातर्फे विद्यार्थी गुणगौरव सोहळा



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका कुणबी समाज साले ग्रुप आयोजित समाजातील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवारी (दि.२७) कुणबी भवन माणगाव येथे तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांच्या हस्ते व साले ग्रुपचे अध्यक्ष भागोजीबुवा डवले यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाला. या वेळी समाजातील ६५ टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या दहावी व बारावीतील १०० हुन अधिक विद्यार्थ्यांचा गुणगौरव उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

सोहळ्यात माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांनी सुरुवातीलाच कुणबी समाजाचे ज्येष्ठ नेते स्व. बाबुराव भोनकर यांच्या समाजकार्याला उजाळा दिला. भागोजीबुवा डवले यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या भावी आयुष्यात समाजासाठी काम करायला पुढे यावे, असे आवाहन केले.

या वेळी माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे, सदस्य नितीन खडतर, मंडळाच्या तालुका महिला आघाडी अध्यक्षा नीता करकरे यांनीही उपस्थित विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यास तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे खजिनदार रामभाऊ टेंबे, माणगाव पंचायत समिती माजी सभापती संगिता बक्कम, तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे उपाध्यक्ष शैलेश भोनकर, गंगाराम उभारे, साले ग्रुपचे उपाध्यक्ष सुभाष गुगळे, खजिनदार संदीप खरंगटे, सहचिटणीस रवींद्र अर्बन,समाजनेते सखाराम जाधव, सहदेव बक्कम,बाळ उभारे, मंडळाच्या तालुका महिला आघाडी अध्यक्षा नीता करकरे,संजय बक्कम, सीताराम भोनकर, कृष्णा पानावकर, नथुराम मोरे आदी उपस्थित होते.

या गुणगौरव सोहळ्याचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विघवली शाळेचे शिक्षक कृष्णा पानवकर यांनी मानले.

# मुठवली गावाजवळ कार जळाली

### प्रसंगावधानता दाखवल्याने चालक बचावला

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यामधील तळा इंदापूर मार्गावर मुठवली गावाजवळ शनिवारी (दि.२६) रात्री एका कारने भर रस्त्यात पेट घेतला. या वेळी कारचालक प्रसंगावधानता दाखवून बाहेर पडला त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

कारमध्ये फक्त कार चालक होता. कारला कशामुळे आग लागली याचे कारण समजू शकले नाही. घटनेची माहिती मिळताच ताबडतोब सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेचे बचाव पथक व अग्निशमन दल व पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी आग विझवली. आग भिजवल्यानंतर रस्त्यात असलेली कार सर्वांनी मिळून बाजूला करून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला.



# यशवंतखार नूतन विद्यालयात विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा रायगड जिल्ह्याचे खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मुरुड तालुक्यातील यशवंतनगर पंचक्रोशीतील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील सुमारे ७५० विद्यार्थ्यांना रोहा येथील वरदायी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे जवळपास तीन हजार वह्या मोफत वाटपाचा कार्यक्रम विद्यालयात नुकताच करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे मुरूड तालुकाध्यक्ष फैरोजशेठ घलटे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोशल मिडिया सेलचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, मुरूड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अजित कासार, माजी उपसरपंच योगेंद्र गोयजी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. मुरूड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे आपल्या भाषणात म्हणाले की, खासदार सुनील तटकरे यांनी मुरुड तालुक्याचा विकास करण्यासाठी विविध स्वरूपात निधी देऊ केला आहे. शैक्षणिक क्षेत्रात मुलांची व मुलींची प्रगती व्हावी त्यांना मूलभूत सेवा मिळाव्यात यासाठी सायकल बरोबरच आता वह्या सुधा वाटप करीत आहोत. या वह्या मुरुड तालुक्यातील सर्व शाळेत पोहचणार असून पालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. अजित कासार व हसमुख जैन यांनी सुधा मार्गदर्शन पर भाषणे केली.

या वेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतिक पेडणेकर व विद्यालयातील शिक्षक शिक्षिका तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.





# सागरिका जांभळेला पुरस्कार



**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

मँगो वर्ल्ड रिसॉर्ट, आसरे गाव, चौक येथे, नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पर्सोनेल मॅनजमेंट, रायगड विभाग यांच्या २०२५-२७ पदग्रहण समारंभ नुकताच झाला.

सामाजिक कार्यात अग्रेसर असल्याबद्दल तसेच इतिहास घडविणारा रायगड जिल्ह्यातील पहिल्या व्यावसायिक मेगा एक्स्पो आयोजनाबद्दल प्रमुख पाहुणे के.आर.ओकार, ॲड.मिलिंद धडपले, शास्त्रज्ञ् धर्मराज पाटील, उद्योजक आशपाक लोगडे यांच्या हस्ते व नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पर्सोनल मॅनेजमेंटचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत विशेष गौरव पुरस्काराने खोपोलीतील सागरीका जांभळे हिला सन्मानित करण्यात आले.

या वेळी नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पर्सोनेल मॅनजमेंट, रायगड विभागाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झालेले रायगड जिल्हाध्यक्ष किशोर शेळके व नवनियुक्त पदाधिकारी यांच्या हस्ते सुलभा शरद पाटील, डी. एस गुरव, असलम लोगडे यांचा ही विशेष गौरव करण्यात आला.

सागरीका योगिता शेखर जांभळे या लिओ क्लब ऑफ खारघरच्या अध्यक्षा असून सहज सेवा फाउंडेशनच्या युवा अध्यक्ष तसेच रायगड बिजनेस असोसिएशनच्या संचालिका आहेत.

# नागावमधील ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

सामाजीक व किडा क्षेत्रात अल्पावधीत प्रसिध्दीस आलेले नागावचे प्रसिध्द उदयोजक व युवा नेतृत्व अशी ओळख असलेले डॉ. सचिन राउळ यांनी नागावच्या युवावर्ग व ग्रामस्थांसह शिवसेनेत पक्ष प्रवेश केला.

अलिबाग-राजमळा येथील अलिबाग विधानसभा आमदार महेंद्र दळवी यांच्या निवासस्थानी शुक्रवार दि. २५ जुलै २०२५ रोजी सायकांळी पाच वाजता डॉ. सचिन राउळ व नागाव युवावर्ग तसेच ग्रामस्थ यांच्या पक्ष प्रवेश कार्यक्रम झाला. या वेळी आमदार महेंद्र दळवी यांचे सह माजी जि.प.सदस्या मानसीताई दळवी, शिवसेना जिल्हा प्रमुख राजा केणी, उपजिल्हा प्रमुख शैलेश चव्हाण, शिवसेना रायगड जिल्हा खजिनदार सुरेश म्हात्रे, शिवसेना अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी, शिवसेना रोहा तालुका प्रमुख मनोज शिंदे, शिवसेना कामगार नेते दीपक रानवडे, शिवसेना रायगड जिल्हा महिला संघटिका संजिवनी नाईक, महिला विधानसभा संघटिका तनुजा मोरे, चौल महिला विभाग प्रमुख ज्योती मुंबईकर आदी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह मोठया संख्येने सचिन राउळ मित्रपरिवार व हितचिंतक व नागाव युवावर्ग, ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

नागावचे प्रसिध्द उद्योजक व युवा नेतृत्व अशी ओळख असलेले डॉ. सचिन राउळ यांच्या शिवसेनेत पक्ष प्रवेश कार्यक्रम झाला. आमदार महेंद्र दळवी यांनी भगवी शाल प्रदान करून शिवसेना पक्षात स्वागत केले. या वेळी सचिन राउळ यांचेसह सदस्य परेश ठाकूर, सदस्य रोहन नाईक, व्यावसायीक राकेश राणे, व्यावसायीक आदित्य भगत, चौल भगवती व्यावसायीक मंदार वर्तक, व्यावसायीक प्रितेश घरत आदींनीसुध्दा शिवसेनेत प्रवेश केला.

या वेळी चौल शिवसेना पदाधिकारी व उद्योजक डॉ. सचिन राउळ यांनी चौल-आग्राव रस्ताचे काम त्वरीत मार्गी लावण्याची मागणी केली, त्यानुसार आमदार महेंद्र दळवी यांनी चौल-आग्राव रस्ता नुतनीकरणाचे काम त्वरीत करण्यासाठी संबधीत अधिकारी वर्गास सुचना दिल्या.



# किशोर पाटील यांची निवड



**चौक : प्रतिनिधी**

लायन्स क्लब खालापूर यांचा श्री क्षेत्र अष्टविनायक मंदिर महड येथे पदग्रहण कार्यक्रम झाला. सन २०२५/२६ साठी हभप. किशोर पाटील यांची खालापूर तालुका लायन्सपदी निवड करण्यात आली. तर प्रथम उपाध्यक्षपदी भरत पाटील, द्वितीय उपाध्यक्षपदी हरिभाऊ जाधव, सचिवपदी लहू भोईर, ट्रेजररपदी जितेंद्र सकपाळ यांची नियुक्ती करण्यात आली व त्यांनी पदभार स्वीकारला.

नवनिर्वाचित अध्यक्ष लायन किशोर पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात लायन्स क्लबची माहिती, उद्दिष्ट सांगितली व पुढील काळात करण्यात येणाऱ्या कामाची माहिती दिली.

# युईएस स्कूलमध्ये दीपपूजा

**उरण : वार्ताहर**

अमावस्येच्या निमित्ताने गुरुवारी (दि.२४) युईएस स्कूलमध्ये मोठ्या उत्साहात 'दीपपूजा उत्सव' साजरा करण्यात आला. माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे दिवे आणले होते.

यु.ई.एस. संस्थेचे मानद सचिव आनंद भिंगार्डे, सहसचिव ॲड. अपूर्वा ठाकूर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, समन्वयक व पीटीएचे उपाध्यक्षह्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला.




# हिंदी परीक्षेला नांदगाव हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

महात्मा गांधी राजभाषा हिंदी प्रचार संस्था सदाशिव पेठ- पुणे आयोजित हिंदी परीक्षेला मुरूड तालुक्यातील नांदगाव हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी विक्रमी प्रतिसाद नोंदविला.

शनिवारी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या सभागृहात झालेल्या सदर परीक्षेत एकूण ४३७ विद्यार्थी सहभागी झाले होते. विशेष म्हणजे आजपर्यंत झालेल्या या परीक्षेतील हा उच्चांकी आकडा असल्याचे हिंदी विषयाचे परीक्षेचे प्रमुख राहिल घलटे, राजश्री घाडगे, शिल्पा कळके यांनी सांगितले. हिंदी भाषेचा प्रचार व विकास होण्यासाठी ही परीक्षा पुणे विभागाकडून घेतली जाते. संपूर्ण भारतात या परीक्षेचे आयोजन केले जाते. संपूर्ण भारतात परीक्षा घेण्यात येत असताना हिंदी विषयात विशेष मेहनत घेणाऱ्या शाळा व प्राविण्य मिळवलेल्या शाळांची विशेष माहिती संपूर्ण भारतात प्रसिद्ध होणाऱ्या क्रोनिका पुस्तिकेमध्ये श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतगर नांदगाव हायस्कूलचा उल्लेखसुद्धा करण्यात आला आहे. तसेच मागील सात वर्षांपासून ही परीक्षा घेण्यात येते सदरची परीक्षेमध्ये बसणासाठी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कसुद्धा भरावे लागते, परंतु यंदाच्या या हिंदी परीक्षेमध्ये ४३७ विद्यार्थ्यांकी परीक्षेत बसल्याने मोठा उचांक या विद्यालयाने गाठला आहे.



परीक्षेसाठी विद्यालयातील शिक्षक भारत चव्हाण, निशा बिरवाडकर, भारती बांद्रे, नियती ठमके, योगेश पाटील, महेश वाडकर, महादू अहिरे, सागर राऊत, रवींद्र ढोले, सिध्दार्थ काकनाटे, अमर दरणे, दत्तात्रय खुळपे, रिंकल तिडके आदी शिक्षकांनी पर्यवेक्षणाचे काम केले.

# न्यूझीलंडचा आफ्रिकेवर रोमहर्षक विजय

## तिरंगी टी-२० मालिका जिंकली

**हरारे : वृत्तसंस्था**

यजमान झिम्बाब्वेसह दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यातील तिरंगी टी-२० मालिकेतील अंतिम सामना हरारेच्या मैदानात खेळवण्यात आला. या सामन्यात दक्षिण आफ्रिका संघाने नाणेफेक जिंकून धावांचा पाठलाग करण्याला पसंती दिली, पण धावांचा पाठलाग करताना अखेरच्या षटकात हातात आलेला सामना त्यांनी गमावला. आफ्रिकेच्या तोंडचा घास हिरावून घेत न्यूझीलंडने या सामन्यासह ट्रॉफीवर नाव कोरले.



अंतिम सामन्यात न्यूझीलंडच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात ५ बाद १८० धावा करत दक्षिण आफ्रिकेसमोर १८१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेने शेवटच्या षटकापर्यंत सामन्यावर वर्चस्व ठेवले, पण अखेरच्या षटकात सहा विकेट्स हातात असताना आफ्रिकेच्या संघाला सात धावा निघाल्या नाहीत. मॅट हेन्रीने 'चमत्कारी' षटकासह न्यूझीलंडच्या संघाला अशक्यप्राय वाटणारा विजय मिळवून दिला. त्याने या षटकात फक्त तीन धावा देत दोन विकेट्स घेतल्या.

नाणेफेक गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करण्याची वेळ आल्यावर सीफर्ट आणि कॉन्वे जोडीने संघाला दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ७५ धावांची भागीदारी रचली. सीफर्ट ३० धावा करून तंबूत परतल्यावर कॉन्वेने ४७ धावांची महत्त्वूर्ण खेळी केली. या दोघांशिवाय रचिन रवींद्र याने ४७ धावांची खेळी केली.

धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेच्या संघाकडून प्रीटोरियस आणि हेंड्रिक्स या सलामी जोडीने ९२ धावांची सलामी दिली. प्रीटोरियस ५१ धावांवर बाद झाल्यावर हेंड्रिक्सही ३७ धावा करून तंबूत परतला. दक्षिण आफ्रिकेच्या संघाने दोन विकेट्सच्या मोबदल्यात धावफलकावर १३२ धावा लावल्या होत्या. त्यामुळे या सामना त्यांच्या हातात होता. अखेरच्या षटकात सहा विकेट्स हातात असताना सात धावांची गरज असताना डेवाल्ड ब्रेविसही मैदानात होता, पण तो मोठा फटका मारण्याचा नादात आउट झाला अन् सामना न्यूझीलंडच्या बाजूने फिरला.

### शेवटच्या षटकात मिळाली कलाटणी

अखेरच्या षटकात सामना दक्षिण आफ्रिकेच्या बाजूने झुकला असताना न्यूझीलंडच्या सँटरनरने चेंडू मॅट हेन्रीच्या हाती सोपवला. या षटकात सेट झालेला बॅटर डेवॉल्ड ब्रेविस स्ट्राइकवर होता. पहिला चेंडू निर्धाव खेळल्यावर त्याने मोठा फटका खेळला अन् दक्षिण आफ्रिकेने महत्त्वाची विकेट गमावली. तिसऱ्या चेंडूवर कॉर्बिन बॉशने दोन धावा घेतल्या. त्यानंतर चौथ्या चेंडूवर एक धाव घेतल्यावर लिंडे स्ट्राइकवर आला. अखेरच्या दोन चेंडूत चार धावांची गरज असताना हेन्रीने लिंडेला बाद केले. अखेरचा चेंडू निर्धाव टाकत त्याने संघाला तीन धावांनी विजय मिळवून दिला.

# गिलने मोडला मोहम्मद युसुफचा विक्रम

## इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करणारा आशियाई बॅटर

**लंडन : वृत्तसंस्था**

मँचेस्टर येथील ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानात टीम इंडिया अडचणीत असताना टीम इंडियाचा नवा 'सेनापती' शुबमन गिल याने संघाचा डाव सावणारी खेळी केली. कसोटी कारकिर्दीतील आठवे अर्धशतक झळकवताना त्याने मोठा डाव साधला आहे.



इंग्लंडच्या संघाने पहिल्या डावात मोठी आघाडी घेतल्यावर दुसऱ्या डावात भारतीय संघाची सुरुवात एकदम खराब झाली. पहिल्याच षटकात सलामीवीर यशस्वी जैस्वालपाठोपाठ साई सुदर्शन याने तंबूचा रस्ता धरला. संघाची अवस्था दोन बाद शून्य अशी असताना गिल चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने सलामीवीर लोकेश राहुलसोबत उत्तम खेळीचा नजराणा पेश करताना संघाला मोठा दिलासा दिला.

मँचेस्टर कसोटीतील पहिल्या डावात अपयशी ठरल्यावर दुसऱ्या डावात अर्धशतकाच्या जोरावर शुबमन गिलने मोठी कामगिरी केली आहे. तो आता इंग्लंडच्या मैदानात एका कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करणारा आशियाई बॅटर ठरला आहे. याआधी हा विक्रम पाकिस्तानचा माजी क्रिकेटर मोहम्मद युसुफ याच्या नावे होता. २००६मध्ये पाकिस्तानच्या दिग्गजाने चार कसोटी सामन्यात ६३१ धावा केल्या होत्या.

इंग्लंड दौऱ्यातून कॅप्टन्सीची नवी इनिंग सुरू करणाऱ्या शुबमन गिलने लीड्सच्या हेडिंग्लेच्या मैदानातील पहिल्या कसोटी सामन्यात पहिल्या डावात १४७ आणि दुसऱ्या डावात आठ धावांची खेळी केली होती. बर्मिंगहॅमच्या एजबेस्टन कसोटी सामन्यातील पहिल्या डावात २६९ धावा केल्यावर दुसऱ्या डावात त्याने १६१ धावांची धमाकेदार इनिंग खेळली होती. लॉर्ड्सच्या मैदानातील तिसऱ्या सामन्यात शुबमन गिल अपयशी ठरला. मँचेस्टर कसोटीतील पहिल्या डावात १२ धावांवर तंबूत परतल्यावर दुसऱ्या डावात त्याने कमबॅक करत महत्त्वपूर्ण खेळी साकारली.

# पीटरसनच्या मते, हल्ली फलंदाजी करणे खूप सोपे!

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड संघाने चौथ्या कसोटीत ६६९ धावा करत मँचेस्टरच्या मैदानावरील सर्वात मोठी धावसंख्या नोंदवली, पण इंग्लंडचा माजी दिग्गज फलंदाज केविन पीटरसनने केलेल्या वक्तव्यामुळे वाद निर्माण झाला आहे.

पीटरसनने कसोटी खेळणाऱ्या देशांमध्ये गोलंदाजीचा दर्जा घसरल्यामुळे २०-२५ वर्षांपूर्वीच्या तुलनेत सध्याच्या काळात फलंदाजी करणे खूप सोपे झाल्याचे म्हटलं आहे. इंग्लंडचा फलंदाज जो रूटने ऑस्ट्रेलियाच्या रिकी पाँटिंगला मागे टाकून कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसरे स्थान मिळवल्यानंतर दुसऱ्या दिवशी सोशल मीडियावर पीटरसनने पोस्ट शेअर केली.

पीटरसनने पोस्टमध्ये लिहिले की, माझ्यावर वैतागू नका, पण गेल्या २०-२५ वर्षांपूर्वीच्या तुलनेत हल्ली फलंदाजी करणे खूप सोपे झाले आहे. कदाचित तेव्हा फलंदाजी करणे आजच्यापेक्षा दुप्पट कठीण होते.

पीटरसनने त्याच्या काळातील अनेक दिग्गज गोलंदाजांची नावं घेतली आणि क्रिकेटप्रेमींना या दिग्गजांशी तुलना करता येईल असे १० समकालीन गोलंदाजांची नावे सांगण्याचे आव्हान दिले. पीटरसनने पोस्टमध्ये पुढे लिहिले, वकार, शोएब, अक्रम, मुश्ताक, कुंबळे, श्रीनाथ, हरभजन, डोनाल्ड, पोलॉक, क्लुसनर, गॉफ, मॅकग्रा, ब्रेट ली, वॉर्न, गिलेस्पी, बाँड, व्हेटोरी, केर्न्स, वास, मुरली, कर्टली, कोर्टनी आणि यादी खूप मोठी होऊ शकते. मी वर २२ गोलंदाजांची नावे सांगितली आहेत. कृपया मला वर दिलेल्या नावांशी मेळ साधणाऱ्या सध्याच्या १० गोलंदाजांची नाव सांगू शकाल?

अनेक चाहते पीटरसनशी सहमत आहेत, तर काहींना वाटते की, आधुनिक क्रिकेटला अजून वेगळी आव्हाने आहेत. यावरू वादविवाद सुरू आहे.

# केएल राहुलने पार केला नऊ हजार धावांचा टप्पा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघातील सलामीवीर फलंदाज केएल राहुलने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नऊ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. इंग्लंडविरुद्धच्या मँचेस्टर कसोटीत त्याने ही कामगिरी केली

मुख्य बाब म्हणजे केएल राहुल ज्या वेळी फलंदाजी करत होता त्यावेळी भारतीय संघाला सुरुवातीलाच दोन मोठे धक्के बसले होते. यशस्वी जैस्वाल आणि साई सुदर्शन शून्यावर माघारी परतले होते. असे असतानाही राहुलने शुबमन गिलसोबत मिळून डाव सावरला. त्याने या मालिकेतील प्रत्येक सामन्यात दमदार कामगिरी केली आहे. आता या फलंदाजाने नऊ हजार धावांचा टप्पा ओलांडला आहे.













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com